सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ०८ एप्रिल २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३५९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### भीम वकानी यांचे निधन

अहमदाबाद : टेलिव्हिजनवरील सर्वात लोकप्रिय मालिका 'तारक मेहता का उल्टा चश्मा' मधील दयाबेनच्या भूमिकेसाठी ओळखली जाणारी प्रसिद्ध अभिनेत्री दिशा वकानी हिला तिच्या कुटुंबाकडून एक अत्यंत दुःखद बातमी मिळाली आहे. दिशा वकानीचे वडील आणि ज्येष्ठ अभिनेते भीम वकानी यांचे अहमदाबादमध्ये निधन झाले आहे. ते काही दिवसांपासून आजारी होते. भीम वकानी हे केवळ एक उत्कृष्ट अभिनेतेच नव्हते, तर त्यांनी आपली मुलगी दिशा आणि सुंदरलालची भूमिका साकारणारा मुलगा मयूर वकानी यांच्या कारकिर्दीला आकार देण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली होती.

### श्रीनगरमध्ये पाच जणांना अटक

श्रीनगर : श्रीनगर पोलिसांनी मोठी कारवाई करत बंदी घालण्यात आलेल्या दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाशी संबंधित एका आंतरराज्यीय दहशतवादी मॉड्यूलचा भंडाफोड केला आहे. या ऑपरेशनदरम्यान दोन पाकिस्तानी दहशतवाद्यांसह एकूण पाच जणांना अटक करण्यात आली आहे. श्रीनगरमधून अब्दुल्ला उर्फ अबू हुरैरा याच्यासह पाच जणांना अटक करण्यात आली आहे. अब्दुल्ला हा गेल्या १६ वर्षांपासून फरार होता. जम्मू-काश्मीरच्या बाहेर लष्कर-ए-तैयबाची ठिकाणे उभारण्यात तो यशस्वी झाला होता. पोलिसांनी सांगितले की, अब्दुल्लासोबतच पाकिस्तानी दहशतवादी उस्मान उर्फ खुबैब यालाही या मोठ्या कारवाईत अटक करण्यात आली आहे. या मोठ्या कारवाईत जम्मू-काश्मीर पोलिसांसोबत केंद्रीय यंत्रणांनीही सहभाग घेतला. तपास यंत्रणांनी जम्मू-काश्मीर, राजस्थान आणि हरियाणा यांसह १९ ठिकाणी छापे टाकले असून आक्षेपार्ह साहित्य जप्त करण्यात आले आहे.

### एअर इंडियाची भाडेवाढ

नवी दिल्ली: टाटा ग्रुपच्या मालकीच्या एअर इंडियाने प्रवाशांना मोठा धक्का दिला आहे. जर तुम्हीही एअर इंडियाने प्रवास करण्याचा विचार करत असाल, तर आता तुमच्या भाड्यात वाढ होऊ शकते. कंपनीने ८ एप्रिलपासून आपल्या इंधन अधिभाराच्या रचनेत बदल जाहीर केला आहे, ज्यामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय दोन्ही मार्गांवरील तिकिटे अधिक महाग होणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ७ एप्रिल रोजी जारी केलेल्या एका निवेदनात एअर इंडियाने म्हटले आहे की, जागतिक स्तरावर जेट इंधनाच्या (एटीएफ) किमतीत झालेल्या मोठ्या वाढीमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

### विद्यार्थ्याचा मृत्यू

पुणे : पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात घडलेल्या एका दुर्दैवी अपघाताने खळबळ उडाली आहे. बास्केटबॉल खेळताना लोखंडी स्टॅन्ड कोसळून एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली असून, या प्रकरणामुळे सुरक्षेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.इंदोरी येथील तोलानी मेरीटाईम इन्स्टिट्यूटमध्ये ही घटना घडली. विशाल वर्मा (वय २०) असे मृत विद्यार्थ्याचे नाव असून तो बी. टेकच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत होता. अपघात इतका गंभीर होता की त्याचा जागीच मृत्यू झाला आहे.

### आठवलेंची हॅट्रिक

मुंबई: रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची तिस-यांदा राज्यसभेवर बिनविरोध निवड झालेली आहे. सोमवारी संसदेत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आपल्या तिसऱ्या टर्मच्या राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतल्याने त्यांनी राज्यसभा खासदार पदाची हॅट्रिक केली आहे. राज्यसभेतील हॅट्रिकबद्दल रामदास आठवले यांचे देशभरातील दलित बहुजन आंबेडकरी जनतेसह सर्व वर्गातील जनतेने अभिनंदन केले आहे.

### महिलेची फसवणूक

पुणे : ऑनलाईन मॅट्रिमोनियल साइटवरून सुरू झालेली ओळख किती धोकादायक वळण घेऊ शकते, याचे जिवंत उदाहरण पुण्यात समोर आले आहे. शादी डॉट कॉमवर ओळख झालेल्या एका व्यक्तीच्या प्रेमात पडून इंदोरहून पुण्यात आलेल्या ४२ वर्षीय पीडितेची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार हडपसर परिसरात उघडकीस आला आहे.

# आपत्तीचा फटका बसलेल्या नागरिकांना गृह कर्जात सवलत

## – राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय – सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांना कर्जासाठी सवलत

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०७ एप्रिल :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.७) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आदीसह मंत्री उपस्थित होते. यावेळी आपत्तीचा फटका बसलेल्या नागरिकांना गृह कर्जात सवलत तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांना कर्जासाठी सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.ऋशोसीरहिळल ठशषशीशपलश

महाराष्ट्रात नवीन स्वतंत्र इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दीमत्ता विभाग. विकसित भारत २०४७ मधील विकसित महाराष्ट्राच्या उद्दिष्टाच्या पुर्तीसाठी महत्वाचे पाऊल. माहिती तंत्रज्ञान संचालनायाचे रुपांतर इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दीमत्ता आयुक्तालयात होणार. मंत्रालयीन विभाग, आयुक्त कार्यालय व सर्व जिल्ह्यांसाठी कायमस्वरुपी पदांचा समावेश असलेले नवीन माहिती तंत्रज्ञान संवर्ग निर्माण होणार. राज्यातील माहिती तंत्रज्ञान, एआय, डीजिटल गव्हर्नन्सला गती लाभणार.

महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग प्लिकेशन सेंटर आता कंपनी. सोसायटी अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणी रद्द करुन कंपनी अधिनियम, २०१३ मधील कलम ८ अंतर्गत कंपनी स्थापन होणार. या निर्णयामुळे रस्ते माहिती प्रणाली, नगररचना, जलयुक्त शिवार-पाणलोट विकास, डोंगरी विकास योजना, ई- पंचनामा, महाग्री टेक, कांदळवन अभ्यास, भूजल व्यवस्थापन, खनिज व खाणींच्या अभ्यासाला गतिमानता लाभणार.

भू-स्थानिक तंत्रज्ञान चा वापर करुन प्रशासनात गतिमानता आणण्याकरिता महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी प्लिकेशन सेंटर (महाजिओटेक) कंपनी स्थापन होणार. आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, भूस्थानिक नवोप्रक्रम व उद्योजकता विभागामुळे विद्यार्थी, व्यावसायिक, संशोधकांसाठी शैक्षणिक कार्यक्रम राबविता येणार.



महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी - महावितरणची आर्थिक पुनर्रचना होणार. शासन हमी असलेल्या कर्जासाठी (३२,६७९ कोटी) भांडवली बाजारात सरकारी रोखे येणार. याशिवाय कृषी वितरण व्यवसायाचे विभाजन करण्यात येणार. तसेच महावितरण कंपनी भांडवली बाजारात सूचीबद्ध होणार.

महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविण्यास मंजुरी. आपत्ती व्यवस्थापनात खाजगी भांडवलाच्या मदतीने वित्तपुरवठा उभारणार. यात जागतिक बँकेकडून १६५ कोटींचा निधी मिळणार. आपत्तीचा फटका बसलेल्या नागरिकांना गृह कर्जात तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांना कर्जासाठी सवलत तसेच विमा सुरक्षा उपलब्ध होणार. पुराच्या पाण्याच्या निचऱ्यासाठी कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी शहरांसह कृष्णा खोऱ्यातील पूराचा धोका कमी करण्यासाठी प्रतिबंधक आराखडे तयार करण्यात येणार आहे

# 'बारामती'बाबत माझ्याशी कोणी बोलले नाही : पवार

नवी दिल्ली : अजित पवार यांच्या जाण्याचे दुःख संपूर्ण पवार कुटुंबाला आहे. कुटुंबप्रमुख म्हणून सर्व जबाबदारी आपल्यावर असून ती आपण पार पाडत आहोत. संपूर्ण कुटुंब एक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केले. बारामती निवडणुकीत सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देण्याबाबत विचारले असता बारामतीत माझ्याशी कोणी बोलले नाही, मीही कोणाशी बोललो नाही, असे म्हणत त्यांनी सुनेत्रा पवार यांच्याकडून संवाद साधला गेला नाही, याबद्दल सूचक वक्तव्य केले.

आम्ही सध्या विरोधी पक्षात आहोत. आमची भूमिका त्यानुसार असेल, असे ते म्हणाले, राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी दिल्लीत माध्यमांशी सविस्तर संवाद साधला. संजय राऊत, पार्थ पवार यांनी यांनी केलेल्या वक्तव्यांच्या पार्श्वभूमीवर बोलताना ते म्हणाले, राजकारणात परिपक्वता असणे आवश्यक आहे. काँग्रेस किंवा इतर पक्षांनी काय करावे हे त्यांचे निर्णय आहेत. तसेच महायुतीने



त्यांच्या बॅनरवर माझा फोटो लावला असेल तर ते चुकीचे आहे, असेही ते म्हणाले.

बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीबाबत विचारले असता ते म्हणाले, कोणत्याही पक्षाला उमेदवार देण्याचा पूर्ण अधिकार आहे. निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी अपेक्षा ठेवण्याचे कारण नाही. बारामतीतील निकालाबाबत विचारले असता, मी ज्योतिषी नाही, असे म्हणत त्यांनी स्पष्ट हसत प्रतिक्रिया देणे टाळले.

अपघाताबाबत माझ्याकडे अधिकृत माहिती नाही

अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात रोहित पवार यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. यावर बोलताना शरद पवार म्हणाले, रोहित पवार यांनी अभ्यास केला होता म्हणून ते बोलत आहेत. माझ्याकडे त्या संदर्भात अधिकृत माहिती नाही. सकाळी नऊच्या सुमारास अजित पवार यांचे विमान धावपट्टीच्या बाजूला कोसळले आणि अपघात झाला. त्यानंतर मी त्याच ठिकाणी मी हेलिकॉप्टरने गेलो आणि लँड झालो. अजित पवारांचा अपघात हा अपघात असावा असे माझे प्राथमिक मत आहे. मात्र रोहित यांनी आरोप करताना काही अभ्यास केला आहे म्हणून ते बोलत आहेत.

राज्यातील बाबा संस्कृती चिंताजनक

राज्यात वाढत असलेल्या तथाकथित 'बाबा' संस्कृतीवरही पवारांनी चिंता व्यक्त केली. मी पंढरपूर, कोल्हापूर येथे दर्शनासाठी जातो. मात्र त्याची जाहिरात करत नाही. आजकाल नेते एका बाजूला शिव - फुले - शाहू - आंबेडकर म्हणतात आणि दुसरीकडे अशा प्रवृत्तींना प्रोत्साहन देतात, हे चिंताजनक आहे, असे त्यांनी नमूद केले.

# काशीत 'वैदिक घड्याळ'ची एंट्री!

वाराणसी : उत्तर प्रदेशातील जगप्रसिद्ध काशी विश्वनाथ मंदिर आता केवळ अध्यात्माचेच नव्हे, तर भारताच्या प्राचीन वैज्ञानिक वारशाचेही केंद्र बनले आहे. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी भेट दिलेले 'विक्रमादित्य वैदिक घड्याळ' सध्या भाविकांमध्ये आकर्षणाचे मुख्य केंद्र ठरत आहे. सुमारे ७०० किलोग्रॅम वजनाचे हे भव्य घड्याळ म्हणजे परंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा एक अद्भुत संगम आहे.




हे घड्याळ सामान्य १२ किंवा २४ तासांच्या 'ग्रेगोरियन कॅलेंडर'वर आधारित नसून, पूर्णपणे वैदिक कालमापन पद्धतीवर चालते. दिवसाचे ३० मुहूर्तांमध्ये विभाजन करणारे हे जगातील पहिलेच घड्याळ मानले जाते. याद्वारे स्थानिक वेळेसोबतच तिथी, नक्षत्र आणि इतर खगोलशास्त्रीय माहिती अचूकपणे पाहता येते. या उपक्रमामुळे मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना भारताच्या प्राचीन आणि प्रगत कालगणनेचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. 'विक्रमादित्य वैदिक घड्याळ' हे केवळ वेळ पाहण्याचे साधन नसून, ते निसर्ग आणि विज्ञानाचा मेळ घालणारे एक यंत्र आहे. हे घड्याळ पाश्चात्य पद्धतीपेक्षा वेगळे असून दिवसाची विभागणी ३० मुहूर्तांमध्ये करते, ज्यातील प्रत्येक मुहूर्त साधारण ४८ मिनिटांचा असतो. या घड्याळाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे याची सुरुवात सूर्योदयाच्या वेळी (०:००) होते, तर सूर्यास्ताची वेळ साधारणपणे १५ व्या मुहूर्ताच्या आसपास येते. हे घड्याळ 'स्थानिक माध्य वेळेवर' (डेलरश्र चशरप ढळाश) आधारित असल्याने सूर्याच्या स्थितीनुसार अत्यंत अचूक वेळ दर्शवते. केवळ तास-मिनिटेच नव्हे, तर भारतीय पंचांगातील तिथी आणि नक्षत्र यांचीही माहिती यातून मिळते.

विशेष म्हणजे, हवामानशास्त्र आणि ज्योतिष विभागांनी केलेल्या ताज्या अभ्यासानुसार, वैदिक पद्धतीवर आधारित भाकिते ही आधुनिक हवामान अंदाजांच्या तुलनेत २० ते २३ टक्क्यांनी अधिक अचूक असल्याचे सिद्ध झाले आहे. हे घड्याळ केवळ परंपरा जपणारे साधन नसून, ते खडढ (भारतीय प्रमाणवेळ) आणि ऋखढ (ग्रीनविच मीन टाइम) या दोन्ही जागतिक वेळ पद्धती एकाच वेळी डिजिटल स्वरूपात दर्शवते. वैदिक ग्रंथांमधील प्राचीन ज्ञान आणि आधुनिक डिजिटल तंत्रज्ञान यांचा हा एक यशस्वी प्रयोग आहे. लोकांना आपल्या पारंपरिक ज्ञानप्रणालीशी पुन्हा जोडणे आणि प्राचीन विज्ञानाचे पुनरुज्जीवन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या घड्याळाच्या स्थापनेमुळे भारतीय विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान एकाच व्यासपीठावर आले आहे.

## देशातील चार राज्यांमध्ये निवडणुका, पण हवामानातील टोकाची स्थिती गंभीर धोका; मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम?

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०७ एप्रिल :** एप्रिल महिन्यात पश्चिम बंगाल, आसाम, तमिळनाडू आणि केरळ या चार भारतीय राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होत असताना, हवामानातील वाढती टोकाची परिस्थिती ही निवडणुकीच्या तयारीसाठी गंभीर धोका म्हणून समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर निवडणुका होणाऱ्या राज्यांसाठी वर्तवलेले हवामानाचे इशारे लक्षात घेऊन निवडणुकीच्या दिवसासाठी तयारी व्हायला हवी, याकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

या चारही राज्यांमध्ये २.१९ लाख मतदान केंद्रे असून १७.४ कोटी मतदार मतदान करणार आहेत. या राज्यांमधील एप्रिलमधील गेल्या पाच वर्षांची हवामानाची आकडेवारी आणि भारतीय हवामान विभागाने यंदा एप्रिलसाठी दिलेला अंदाज पाहता वाढती उष्णता, आर्द्रता, मेघगर्जना, विजा हे घटक निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत, याकडे 'क्लायमेट ट्रेंड्स' या मंचामार्फत लक्ष वेधण्यात आले आहे. गेल्या पाच वर्षांतील आकडेवारी पाहता एप्रिल महिना अधिक उष्ण झाल्याचे दिसत आहे. तसेच आर्द्रतेचे प्रमाणही अधिक आहे. एप्रिल २०२२ मध्ये सरासरीपेक्षा १.३६ अंश सेल्सिअसने तापमान अधिक होते. उष्णतेसोबतच वातावरणही बेभरंवशाचे झाले आहे, असेही समोर येते. गेल्या काही काळात पावसाची तीव्र तूट किंवा अतिरिक्त पावसाचीही नोंद झाली आहे. हे वातावरण मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम करणारे ठरू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

आसाममध्ये निवडणुकीच्या आधीच्या काळात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तसेच मेघगर्जनाही होऊ शकते. पश्चिम बंगालमध्ये तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. येथे मेघगर्जनेसह पाऊस तसेच विजांचीही शक्यता आहे. तमिळनाडू आणि केरळमध्ये अधिक प्रमाणात उष्णता आणि आर्द्रता जाणवू शकते. त्यामुळे प्रत्यक्ष तापमानापेक्षा अधिक तापमान जाणवण्याची शक्यता आहे. यामुळे अधिक अस्वस्थता जाणवू शकते. पूर्व किनारपट्टीवर एप्रिलमध्ये सरासरीहून अधिक उष्णतेच्या लाटा निर्माण होऊ शकतात, असा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. पूर्व किनारपट्टीवर पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या निवडणुकीला सामोरे जाणाऱ्या राज्यांचा समावेश आहे. ही वातावरणीय स्थिती निवडणुकीवर विविधांगी परिणाम करू शकते, असे 'स्कायमेट वेदर'चे उपाध्यक्ष महेश पलावत यांनी सांगितले.

एप्रिलमधील वातावरण हे तीव्र होत असल्याने निवडणुकीची तयारी करताना त्यासाठी सज्जता गरजेची आहे. यात उष्णतेशी सामना करण्याची तयारी, वादळासाठीची पूर्वतयारी, सुरक्षेच्या उपाययोजना यांचा विचार आवश्यक असल्याचे या विश्लेषणात स्पष्ट करण्यात आले आहे. यासाठी निवडणूक आयोगाची तयारी असल्याचे अधिकाऱ्यांतर्फे सांगितले जात आहे. त्याच वेळी निवडणुकांमुळे वातावरण बदलाला कसा हातभार लागत आहे, याचाही विचार झाला पाहिजे, असे आवाहन माजी मुख्य निवडणूक अधिकारी ओ. पी. रावत यांनी केले.

# भोंदू खरातविरोधात ठोस पुरावे; ४६५० लिंक्स हटविल्या

## – एसआयटी प्रमुख सातपुतेंनी दिली तपासातील मोठी अपडेट – पीडितांची ओळख उघड न करण्याचे आवाहन

नाशिक : भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणी पोलीस सखोल तपास करत आहेत. त्याने पीडित महिलांचे धमकी देवून शोषण केल आहे. त्याच्यावर एकूण १२ गुन्हे दाखल आहेत. आम्ही सखोल तपास करत आहोत. या प्रकरणी पीडित महिलांनी धाडसाने फिर्याद दिली आहे. आता सर्वांचीच पीडितांच्या खासगी आयुष्य जपण्याची जबबादारी आहे. या प्रकरणी राज्य पोलीस ईडी सहकार्य करत आहे. एकुणच न्यायालयाच्या आदेशानुसारच या प्रकरणी अधिक खुलासा करता येणार नाही, असे विशेष तपास पथकाच्या प्रमुख तेजस्विनी सातपुते यांनी आज (दि. ७) पत्रकार परिषद स्पष्ट केले.

तेजस्विनी सातपुते यांनी सांगितले की, अशोक खरात याच्याविरोधात नाशिक आणि नगर मध्ये एकूण १२ गुन्हे दाखल आहे. एसआयटीकडे असलेल्या गुन्ह्यांपैकी ८ गुन्हे महिला लैंगिक, तीन गुन्हे फसवणूक, सावकरी आणि अंधश्रद्धेशी संबंधित आहेत. महिला लैंगिक अत्याचाराचे आठ गुन्हे आणि फसवणुकीचा एक गुन्हा असे ९ गुन्हे आहेत.

या प्रकरणी एसआयटीने एकूण ३० साक्षीदार तपासले आहेत. खरात पीडित महिला आणि त्यांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत होता. स्वतःकडे दैवी शक्ती असल्याचा भासवत होता. अंधश्रद्धा पसरविण्याचा काम करत होता. खडे, चिंचोके इत्यादी गोष्टीद्वारे तो पैसा उकळत होता. महिलांना कुटुंबीयांच्या मृत्यूची भीती दाखवून, त्यांना बदनामीची धमकी देऊन लैंगिक शोषण करत होता. ईशान्यश्वर मंदिराच्या परिसरात अंधारात दैवी शक्ती असल्याचं भासवून अंधश्रद्धा पसरवत होता, असेही तपासात निष्पण झाल्याचे सातपुते यांनी स्पष्ट केले.

भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणी पीडित महिला आणि कुटुंब धाडसाने पुढे आले आहे. लोक काय म्हणतील याकडे दुर्लक्ष करत पीडित महिलांनी फिर्याद दिली आहे. पीडित महिलांची ओळख पटू नये, गोपनीय ठेवणे महत्वाचे आहे. त्यांचे महिलांचे धैर्य टिकून राहण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे पोलिसांच्या पत्रकार परिषदेला बंधने आहेत, असेही सातपुते यांनी स्पष्ट केले.

अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये न्यायालयाचे काही आदेश आहेत. तर्क वितर्क आधारे वार्तांकन टाळावे असे ही आदेश आहे. महिलांची ओळख पटविल्यास गुन्हा आहे. मद्रास न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार, पीडित महिलांचे फोटो आणि लिंक्स सायबर टीमने डिलीट केल्या आहेत. आक्षेपार्ह पोस्ट प्रकरणी ४५१ अकाउंट थेट बंद केले आहेत. तसेच बदनामी कारक पोस्ट डिलीट केल्या आहेत, अशीही माहिती सातपुते यांनी यावेळी दिली.

ठोस पुरावे गोळा करुन तपास सुरु

या प्रकरणी ६० दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करायचे आहेत. पहिल्या गुन्ह्यात आता ४० दिवस शिल्लक आहेत, इतर गुन्ह्यांची डेडलाईन जवळ आहे. ठोस पुरावे गोळा करून तपास सुरु आहे. फिर्यादी आणि साक्षीदार जे सांगतात त्यानुसार तपास केला जातो. गुन्ह्यांची पार्श्वभूमीवर बघता कुणी मदत केली असेल तर कारवाई केली जाईल. आमचा अजूनही तपास सुरू आहे. या प्रकरणी दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत गोपनीयता बाळगली जाणार आहे, असे स्पष्ट करत अशोक खरातला दुसऱ्या गुन्ह्यात अटक केली असून बुधवारपर्यंत तो पोलीस कोठीडत आहे. पुढील गुन्ह्यांत आम्ही कोठडी मागणार आहेत. काही कारणास्तव आम्ही व्हीसीद्वारे आरोपीला हजर करत आहे. या प्रकरणात ईडीने माहिती मागितली ती दिली आहे यापुढेही सहकार्य राहील, असेही तेजस्विनी सातपुते यांनी स्पष्ट केले. या प्रकरणी दोषारोपपत्र दाखल होत नाही तोपर्यंत सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही तेजस्विनी सातपुते यांनी केले.



## फॅटी लिव्हर आजार दीर्घकाळ कोणतीही स्पष्ट लक्षणे न दाखवता

नाशिक: मेटाबॉलिक डिसफंक्शनशी संबंधित स्टिएटोटिक लिव्हर डिजीज – म्हणजेच लिव्हरमध्ये अल्कोहोलशी संबंधित नसलेली चरबी (फॅट) जास्त प्रमाणात साठणे – भारतात वेगाने एक गंभीर आरोग्य समस्या बनत आहे. हा जगभरातील सर्वात सामान्य क्रॉनिक लिव्हर आजारांपैकी एक असून टाइप 2 मधुमेह, उच्च रक्तदाब, असामान्य कोलेस्ट्रॉल आणि वाढते वजन यांच्याशी याचा घनिष्ठ संबंध आहे.नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या इंस्टिट्यूट ऑफ लिव्हर, इंटेस्टाइन अँड पॅन्क्रियास सायन्सेसचे लिव्हर व मल्टी-ऑर्गन ट्रान्सप्लांट डायरेक्टर, डॉ. गौरव चौबल म्हणाले, " मेटाबॉलिक डिसफंक्शनशी संबंधित स्टिएटोटिक लिव्हर डिजीज चे वेळेवर व्यवस्थापन किंवा उपचार करण्यात सर्वात मोठे आव्हान म्हणजे फॅटी लिव्हर आजार दीर्घकाळ कोणतीही स्पष्ट लक्षणे न दाखवता राहतो.

## भाजपचा वटवृक्ष कार्यकर्त्यांच्या संघर्षातून उभा राहिलेला आहे

छत्रपती संभाजीनगर : सोमवारी भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिन आहे. ६ एप्रिल १९८० रोजी पक्षाची स्थापना झाली. पक्षाने ४६ वर्षे पूर्ण करून ४७व्या वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्ताने महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी लेख लिहून आपले विचार मांडले आहेत. सामान्य कार्यकर्ता ते पक्षाचा प्रदेशाध्यक्ष हा प्रवास फक्त भाजपसारख्या संघटनेतच शक्य असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे लिहिले की, विचारधारेच्या घट्ट मुळांनी मातीत रुजलेला आणि कार्यकर्त्यांच्या संघर्षातून उभा राहिलेला भारतीय जनता पक्षाचा विशाल वटवृक्ष आज ४७व्या वर्षात पदार्पण करत आहे. ६ एप्रिल १९८० रोजी रोवलेले हे बीज आज सुमारे २५ कोटींहून अधिक कार्यकर्त्यांच्या मेहनतीने संपूर्ण देशभर विस्तारले आहे.

## आयआयएसईआरमधील प्रवेश नोंदणी १३ एप्रिलरोजी बंद होईल

पुणे, :आयआयएसईआर अभियोग्यता चाचणी (आयएटी) २०२६ साठी अर्ज करण्याची मुदत १३ एप्रिल २०२६ रोजी संपेल, जी विज्ञान शिक्षण आणि संशोधनासाठी समर्पित असलेल्या भारताच्या राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्याची देशभरातील विद्यार्थ्यांसाठी शेवटची संधी असेल.आयआयएसईआर बेरहामपूर, आयआयएसईआर भोपाळ, आयआयएसईआर कोलकाता, आयआयएसईआर मोहाली, आयआयएसईआर पुणे, आयआयएसईआर तिरुवनंतपुरम आणि आयआयएसईआर तिरुपती येथील बीएस-एमएस (ड्युअल डिग्री) आणि चार वर्षांच्या बीएस पदवी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या इच्छुक उमेदवारांना अधिकृत वेबसाइटला भेट देऊन आयआयएसईआर ॲप्टिट्यूड टेस्ट (आयएटी २०२६) साठी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## वकिलीचा परवाना हा केवळ कागदाचा तुकडा नाही

छत्रपती संभाजीनगर : सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल आपल्या वास्तववादी कथाकथन आणि दमदार अभिनयामुळे प्रेक्षकांच्या मनाला भिडत आहे. अलीकडच्या ट्रॅकमध्ये प्रेक्षकांनी पुष्पाच्या आयुष्यातील सर्वात हृदयद्रावक क्षण पाहिला — खोट्या लाचखोरीच्या आरोपानंतर तिचं वकीली परवाना निलंबित झालं आणि तिचं जग अक्षरशः कोसळलं.हा प्रसंग कथानकातील एक मोठा टर्निंग पॉइंट ठरला, ज्यात पुष्पा तिच्या सर्वात असुरक्षित अवस्थेत दिसते — तिची ओळख हिरावली जाते, पण तरीही ती आपल्या मूल्यांवर ठाम राहते. हा भावनिक क्षण जिवंत करण्यासाठी करुणा पांडे यांनी स्वतःला पुष्पाच्या वेदनेत पूर्णपणे झोकून दिलं आणि प्रेक्षकांच्या मनाला भिडणारा अभिनय साकारला.

## 'इत्ती सी खुशी'मध्ये लग्नसोहळ्याची सुरुवात

छत्रपती संभाजीनगर : सोनी सब वरील इत्ती सी खुशी आपल्या भावनिक कथाकथनामुळे प्रेक्षकांच्या मनाला भिडत आहे. अन्विता (सुम्बुल तौकीर खान) आणि विरात (रजत वर्मा) त्यांच्या नात्याच्या नव्या टप्प्यात प्रवेश करत आहेत. वैयक्तिक संघर्ष, गैरसमज आणि भावनिक चढउतार पार करून अखेर त्यांच्या लग्नाच्या विधींची सुरुवात होते, ज्यामुळे कुटुंबात आनंद, प्रेम आणि एकत्रतेचे वातावरण निर्माण होते.

# समोरासमोर भीषण धडक; माय-लेकी गंभीर

## सोलापूर–धुळे महामार्गावर अपघातांची मालिका, सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**तभा वृत्तसेवा**

कन्नड :- ० ७ एप्रिल - शहरालगतच्या सोलापूर–धुळे महामार्गावरील बायपासवर मंगळवारी सकाळी भीषण अपघात झाला. मेवात हॉटेलसमोर दोन वाहनांची समोरासमोर जोरदार धडक होऊन माय-लेकींसह तिघे जखमी झाले असून त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरहून चाळीसगावकडे जाणारे वाहन क्र. HR 26 CA 7369 आणि मजुरांना घेऊन छत्रपती संभाजीनगरकडे येणारे वाहन क्र. MH 20 BY 8357 यांची बायपासवर समोरासमोर धडक झाली. पुलाचे काम सुरू असल्यामुळे वाहतूक वळविण्यात आली आहे; मात्र त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या सुरक्षेच्या उपाययोजना नसल्याने हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती आहे.

या अपघातात बिना कुमारी जीतेंद्र कुमार (वय ३६) व त्यांची मुलगी सोन्या कुमारी जीतेंद्र कुमार (वय १०) या दोघींना गंभीर दुखापत झाली आहे. तसेच कार्तिक जीतेंद्र कुमार (वय १६, सर्व रा. रेवाडी, हरियाणा) हा देखील जखमी झाला आहे.

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत जखमींना कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. आर. एस. पुंगळे, अधिपरिचारिका कांचन गिरी व स्वाती डोळस यांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी जखमींना जिल्हा रुग्णालयात हलविले.

दरम्यान, या बायपासवर सुरू असलेल्या अपूर्ण कामांमुळे आणि सुरक्षेच्या अभावामुळे अपघातांची मालिका सुरूच असून प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत.

# जागतिक आरोग्य दिनानिमित्त झी टीव्हीच्या कलाकारांचा संदेश

छत्रपती संभाजीनगर: जागतिक आरोग्य दिनानिमित्त झी टीव्हीवरील लोकप्रिय कलाकारांनी प्रेक्षकांना आरोग्याबाबत जागरूक राहण्याचा आणि व्यस्त जीवनशैलीतही स्वतःला प्राधान्य देण्याचा संदेश दिला आहे. धावपळीच्या दिनचर्येत शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य राखणे हे सुखी आयुष्याचे सूत्र असल्याचे त्यांनी सांगितले.

अभिषेक शर्मा यांनी सांगितले की शूटिंगच्या व्यस्त वेळापत्रकातही वेळेवर जेवण आणि नियमित व्यायामाचे सातत्य राखणे महत्त्वाचे आहे. नसीर खान यांनी चालणे आणि श्वसनासारख्या साध्या सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले. राजेंद्र चावला यांनी आरोग्याला खरी संपत्ती संबोधत मनःशांतीचे महत्त्व स्पष्ट केले.

फरमान हैदर यांच्या मते फिटनेस म्हणजे केवळ बाह्य रूप नसून शरीराला आतून चांगले वाटणे होय. जयती भाटिया यांनी पुरेसे पाणी पिणे आणि वेळेवर झोप घेण्यावर भर दिला. इंदिरा कृष्णा यांनी महिलांना नियमित आरोग्य तपासणी करण्याचा मोलाचा सल्ला दिला. आरोग्याकडे दुर्लक्ष न करता छोट्या पण सकारात्मक सवयी अंगीकारल्यास दीर्घकाळात मोठा फायदा होतो, असे आवाहन सर्व कलाकारांनी एकमुखाने केले आहे.

# आई वडील हे सर्वात मोठे दैवत त्यांची सेवा करा : स्वामी अरुण नाथ गिरीजी महाराज

## नाथ कथा साठी उपस्थित हजारो भाविक भक्तांना केले आवाहन

**तभा वृत्तसेवा**

खुलताबाद दि ७ एप्रिल श्री क्षेत्र वेरूळ येथील नाथ आश्रम या ठिकाणी दि २ एप्रिल ते ८ एप्रिल पर्यंत दररोज सायंकाळी ७ ते ९ या दरम्यान वेरूळ नाथ आश्रम प्रमुख साध्वी नाथ योगिनी अक्का महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शना खाली सुरू असलेल्या श्री क्षेत्र आडबंगनाथ संस्थान मठपती अरुण नाथ गिरीजी महाराज यांच्या मुखातून संगीत नवनाथ कथेचे आयोजन करण्यात आले आहे



घृष्णेश्वर मंदिर बारावी ज्योतिर्लिंग दर्शन घेऊन मनाला प्रसन्नता मिळते घृष्णेश्वर मंदिर ट्रस्टच्या वतीने व पुजारी यांच्यावतीने घृष्णेश्वराचे महत्त्व समजून घेऊन समाधान व्यक्त केले संस्थांच्या वतीने माजी अध्यक्ष संतोष वैद्य यांनी स्वामी अरुणा गिरीजी महाराज घृष्णेश्वराची प्रतिमा भेट देऊन सन्मान केला तसेच श्री क्षेत्र वेरूळ चे वैभव म्हणून ओळख निर्माण झालेले. टाका आश्रम वेरूळ मठपती विद्यानंद वामदेव तीर्थ स्वामी यांचे वास्तव्य असलेल्या पवित्र ठिकाणी. संगीत नव नाथ वाचक अडबंगनाथ संस्थान मठपती स्वामी अरुणाथ गिरीजी महाराज यांनी सदिच्छा भेट देऊन आश्रमात भक्तांच्या सेवेसाठी चालू असलेल्या कार्याबद्दल महाराजांनी नतमस्तक होऊन आपले गुरुवर्य नारायण गिरीजी महाराज यांच्या आशीर्वादाने विकसित झालेल्या अडबंगनाथ संस्थान ला भेट देण्याची विनंती केली. टाका स्वामी आश्रमात असलेल्या गोमातेची सेवा व त्यासाठी केलेली व्यवस्था रम्य परिसर या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक भक्तासाठी प्रसाद म्हणून ताक या ठिकाणी देण्यात येते या गो सेवेच्या पवित्र कार्याला पंचक्रोशीतील भक्तांनी भरभरून मदत करा असे आवाहन संगीतमय नवनाथ कथा दरम्यान केले. याप्रसंगी नाथ आश्रम च्या वतीने पूजन करून काय सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र भरातून आलेल्या सर्व भाविकांना आपली हिंदू संस्कृती टिकवण्यासाठी एक संघ रहा पाखंड्यांचं खंडन करून हिंदू संस्कृती जपा आई-वडिलांना दैवत माणूस सेवा करा गो सेवा करा प्रत्येक गावोगावी धार्मिक कार्यासाठी अन्नदानासाठी दान धर्म करा. हिंदू ग्रंथांची वाचन करा असे आलेल्या भाविकांना उपदेश करताना सांगितले याप्रसंगी टाका आश्रम वेरूळ येथील स्वामी महंत विद्यानंद वामदेव. तुकाराम गाथा वाचक बबन महाराज केदारे आडगावकर माजी सरपंच प्रकाश पाटील मिसाळ माजी सभापती विवेक चव्हाण भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे हरिभक्त पारायण नारायण भांबर्डे उद्योजक ईसाराम मातकर कैलास मिसाळ संतोष करपे पाटील तुकाराम मते रमेश दादा ठोंबरे दामू अण्णा गवळी योगेश राजपूत . यांच्यासह भाविक भक्तांची मोठी उपस्थिती होती

# सुवर्ण मोहोत्सवी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे देणार नाथसागराला भेट

**तभा वृत्तसेवा**

पैठण दि ०७ : राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे ८ एप्रिल बुधवार रोजी छत्रपती संभाजीनगर दौरावर असून ते पैठणच्या नाथसागर जालशय सुवर्ण मोहोत्सव वर्ष शताब्दी निमित्त धरणावर भेट देऊन दुपारी ३ वाजता संतपीठ येथे कालवा सल्लागार समितीच्या सदस्यांसोबत बैठक घेणार आहेत. जायकवाडी धरणावर प्रस्तावित सौर ऊर्जा प्रकल्प, ब्रम्हगव्हाण जलसिंचन योजना, संत ज्ञानेश्वर उद्यानाचा विकास तसेच जायकवाडी उद्योगिक वसाहत सुशोभीकरणा बाबत मंत्री विखे यांचा हा दौरा महत्वाचा मानला जात आहे.

**नाथसागर जलाशयावर सध्या निकृष्ट कामाचा कळस सुरु असून वर्षभरापासून खोदून ठेवण्यात आलेला पास गेट ते पास गेट व्हाया संडावा हा रस्ता थातूर मातुर पद्धतीने उरकण्यात आला आहे. तसेच पाण्यालगत असलेली संपूर्ण दर्शनीय भिंत पोखरण्यात आली आहे.यामुळे धरणावर भेट देणाऱ्या पर्यटकांना मोठा मनस्ताप होत आहे.**

आशिया खंडातील सर्वात मोठे मातीचे धरण असलेल्या जायकवाडी धरण उभारणीचे हे ५१ वर्षं असून धरणाच्या इतिहास पहिल्यांदाज २८ सप्टेंबर २०२५ रोजी जलाशयाच्या सांडव्याद्वारे गोदावरी पात्रात एकाचवेळी ३ लक्ष ६ हजार क्यूसेक प्रमाणे पाण्याचा मोठा विसर्ग करण्यात आला होता.आपत्कालीन परिस्थितीत उत्तम काम तसेच पाणी वाटप कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या यावेळी सत्कार केला जाणार आहे. जलपुजना नंतर मंत्री विखे यांची नाथसागर जलाशयावर ही दुसरीभेट राहणार आहे. यावेळी आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या वतीने मंत्र्यांना धरणातील गाळ काढणे,ब्रम्हगव्हाण जलसिंचन योजना,संत ज्ञानेश्वर उद्यान विकास आराखडा,उजवा आणि डावा कालवा व पूल दुरुस्ती, पूर बाधितांना मदत तसेच ईतर विकास कामांबद्दल चर्चा होणार आहे. मंत्री विखे यांच्या दौरा निमित्त मंगळवारी जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत संत यांच्या प्रमुख उपस्थितीत सहाय्यक अभियंता श्रद्धा निंबाळकर,उप विभागीय अभियंता सारडा, सहाय्यक अभियंता रितेश भादवे, शाखा अभियंता मंगेश शेलार,तुषार विसपुते,गणेश खराडकर अरविंद थोरात आदींनी धरण परिसर तसेच संतपीठ येथे भेट देऊन पाहणी केली.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे पदवी परीक्षेस दि.7 पासून पदवी परीक्षेला प्रारंभ

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.७ एप्रिल** | संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर अंतर्गत पदवी परीक्षेस आज दि.७ एप्रिल २०२६ पासून सुरुवात झाली आहे.महाविद्यालयातील विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात परीक्षेला हजेरी लावली. परीक्षेचे सर्व नियोजन काटेकोरपणे करण्यात आले असून, परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. परीक्षार्थ्यांसाठी बसण्याची व्यवस्था,पिण्याच्या पाण्याची सोय तसेच आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

परीक्षा केंद्रावर शिस्तबद्ध वातावरणात परीक्षेची प्रक्रिया पार पडत असून,महाविद्यालय प्रशासन,प्राचार्य व सर्व प्राध्यापक वर्ग यांचे विशेष लक्ष परीक्षेच्या व्यवस्थापनावर केंद्रित आहे. कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने व प्रामाणिकपणे परीक्षा देऊन उत्तम यश संपादन करावे,असे आवाहन महाविद्यालय प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

**पदवी परीक्षेचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात आले आहे.विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.सर्व विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारचा ताण न घेता आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी आणि उज्ज्वल यश संपादन करावे,अशी अपेक्षा आहे.**

**- प्राचार्य,डॉ.शिरीष पवार**
**संत ज्ञानेश्वर**

# एसबीआय लाइफ इन्शुरन्सची नवीन ब्रँड मोहीम/टीव्हीसीमागील मुख्य विचार काय आहे?

वेगाने बदलणाऱ्या भारतात प्रत्येक वयोगटातील आणि विविध भागांतील लोकांच्या आकांक्षा झपाट्याने वाढत आहेत. मात्र त्याचवेळी कुटुंबाप्रती असलेली आर्थिक जबाबदारी ही जीवनातील निर्णयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असते. एसबीआय लाइफच्या नव्या ब्रँड मोहिमेचा गाभा याच विचारावर आधारित आहे, तो म्हणजे आपल्या प्रियजनांना दिलेली आश्वासने सुरक्षित असतात, तेव्हाच व्यक्ती आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी खऱ्या अर्थाने आत्मविश्वासाने पाऊल उचलू शकते.

नवीन टीव्हीसीमध्ये हा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. आर्थिक संरक्षण असल्यास व्यक्तीला तडजोड न करता मोठी स्वप्ने पाहण्याचे आणि ती पूर्ण करण्याचे धाडस मिळते, हे या मोहिमेतून दाखवण्यात आले आहे. नवीन करिअरची निवड असो, मुलांच्या स्वप्नांना पाठबळ देणे असो किंवा स्वतःचा नवा उपक्रम सुरू करणे असो ही मोहीम संदेश देते की सुरक्षेची खात्री असते, तेव्हा व्यक्ती त्यांच्या इराद्यांवर अधिक ठामपणे आणि धैर्याने कृती करू शकतात.

हा विचार एसबीआय लाइफच्या 'अपने लिये, अपनों के लिये' या मूळ तत्त्वाशी सुसंगत आहे. जीवन विमा हे केवळ आर्थिक उत्पादन नसून जीवनातील महत्त्वाच्या निर्णयांना बळ देणारे साधन आहे, असा कंपनीचा विश्वास आहे. आपल्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करून व्यक्तीला स्वप्ने आणि जबाबदाऱ्या यांचा समतोल साधता येतो आणि मनःशांतीसह पुढे जाता येते.

भावनिक आणि वास्तववादी कहाण्यांद्वारे ही मोहीम एसबीआय लाइफला आयुष्याच्या प्रवासातील विश्वासू सहकारी म्हणून सादर करते, जो व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षा आणि जबाबदाऱ्या दोन्हींचे संरक्षण करतो, तसेच भारतातील प्रत्येक व्यक्ती व कुटुंबाला जीवनातील सर्व स्वप्ने पूर्ण होऊ शकतात याची खात्री देतो.

ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा यांची एसबीआय लाइफचे पहिले ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड का करण्यात आली? जॉली आणि पॉली कोणाचे प्रतिनिधीत्व करतात?

आजचा ग्राहक महत्त्वाकांक्षी आहे, आत्मविश्वासू आहे आणि आयुष्यात अर्थपूर्ण ध्येये गाठण्याची जिद्द असणारा आहे. पण त्याचवेळी तो कुटुंबाप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांबाबतही तितकाच जागरूक असतो. निर्णय केवळ भावनेच्या भरात घेतले जात नाही, तर स्वप्नं आणि जबाबदारी यांचा समतोल साधत घेतले जातात. या बदलत्या विचारसरणीनुसार ब्रँड ॲम्बेसेडरची निवड आधारलेली आहे.

ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा हे दोघेही आयुष्यातील या दोन परस्परपूरक दृष्टिकोनांचे सहज प्रतिनिधीत्व करतात. त्यांना 'जॉली' आणि 'पॉली' म्हणून सादर करण्यात आले आहे. ते केवळ पारंपारिक सेलिब्रिटी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून समोर येत नाहीत, तर जीवनातील महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या दोन भिन्न मानवी प्रवृत्तींचे प्रतीक आहेत.

'जॉली आणि पॉली' ही संकल्पना भारतातील कुटुंबांमध्ये घडणाऱ्या अंतर्गत संवादाचे प्रतीक आहे, जेथे प्रगती करण्याची ओढ आणि आपल्या प्रियजनांची काळजी घेण्याची जबाबदारी यांचा समतोल साधला जातो. त्यांची भूमिका विम्याचे नाट्यमय सादरीकरण करण्याची नाही, तर विम्याला दैनंदिन जीवनाचा स्वाभाविक भाग म्हणून मांडण्याची आहे. जीवन विम्यामुळे व्यक्तीला सुरक्षिततेची भावना मिळते आणि त्यामुळे सकारात्मकता व प्रगतीचा मार्ग सुकर होतो, हा संदेश यातून दिला जातो.

ऋषभ पंतने साकारलेला 'जॉली' हा स्वभावप्रवृत्ती, आशावाद आणि भरभरून जगण्याच्या धैर्याचे प्रतीक आहे. नियोजन करणे म्हणजे स्वातंत्र्य गमावणे नसून, आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे आणि त्याची पूर्तता करणे, हे तो पटवून देतो. याउलट, रवींद्र जडेजाने साकारलेली 'पॉली' ही व्यक्तिरेखा संयम, विश्वासार्हता आणि दीर्घकालीन विचारांचे प्रतिनिधीत्व करते. तो अत्यंत शांतपणे आणि स्पष्टतेने संदेश देतो की, पूर्वतयारी किंवा नियोजन ही केवळ एक जबाबदारी नसून, ती वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि कौटुंबिक सुरक्षा या दोघांनाही बळ देणारी कृती आहे.

ही मोहीम तरुण प्रेक्षकांशी कशी जोडली जाते?

आजची तरूण पिढी महत्त्वाकांक्षी, सुजाण आणि स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास उत्सुक आहे. पण, त्याच वेळी ते कुटुंब, आर्थिक स्थैर्य आणि दीर्घकालीन सुरक्षितता यांप्रती असलेल्या आपल्या जबाबदाऱ्यांबाबत देखील अधिकाधिक जागरूक होत आहेत. ही पिढी कौटुंबिक जबाबदाऱ्या टाळत नाही आहे; उलट, त्या जबाबदाऱ्या आणि स्वतःच्या छंदांचा किंवा आवडीचा पाठलाग यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करत आहे.

ही मोहीम भारतातील घराघरांत सर्रास आढळणाऱ्या प्रसंगांचे चित्रण करून आजच्या पिढीच्या विचारसरणीशी संलग्न होते. यामध्ये करिअरमधील बदल, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि जीवनातील अशा निवडी दाखवल्या आहेत ज्यामध्ये 'धाडस' आणि 'सावधगिरी' या दोन्हीचा मेळ आहे. ही मोहीम कोणत्याही क्लिष्ट आर्थिक संज्ञा किंवा तांत्रिक शब्दांचा वापर न करता, आर्थिक संरक्षण कशा प्रकारे शांतपणे आत्मविश्वास वाढवते हे दर्शवते. एकदा का कुटुंबाप्रती असलेल्या जबाबदाऱ्या सुरक्षित झाल्या की, तरुण पिढीला आपल्या आवडीच्या क्षेत्रांत (Passions) पूर्ण ताकदीने आणि प्रगतीशील पावले उचलणे कसे शक्य होते, हे या कथानकातून प्रभावीपणे मांडले आहे.

तरुण ग्राहक, विशेषतः पहिल्यांदाच विमा पॉलिसी घेणाऱ्यांसाठी, हा संदेश अगदी स्पष्ट आहे: लवकर नियोजन करणे म्हणजे निवडींवर मर्यादा आणणे नसून स्वतःला सक्षम बनवणे आहे. आपल्या प्रियजनांच्या गरजा सुरक्षित करून, तरुणांना त्यांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी एक प्रकारची स्पष्टता, आत्मविश्वास आणि मनःशांती मिळते, जी त्यांना मुक्तपणे प्रगती करण्यास वाव देते.

आगामी काळात एसबीआय लाइफचा ब्रँडचा भर कशावर असेल?

पुढील काळात एसबीआय लाइफचा ब्रँड भर लोकांच्या स्वप्नांना बळ देणाऱ्या सक्षम भागीदाराची भूमिका अधिक मजबूत करण्यावर राहील. आर्थिक सुरक्षितता व्यक्तीला आत्मविश्वासाने आयुष्य जगण्याची ताकद देते, हा विचार अधिक ठळकपणे मांडला जाईल. महत्त्वाकांक्षा आणि जबाबदारी यांचा समतोल साधणे हीच खरी प्रगती आहे, या भूमिकेला ब्रँड पुढेही अधोरेखित करेल. जीवन विमा हा केवळ गरजेपोटी घेतला जाणारा उत्पादन नसून, स्वातंत्र्य आणि नव्या शक्यता उघडणारा सजग निर्णय आहे, अशी भूमिका कंपनी मांडणार आहे.

'अपने लिये, अपनों के लिये' या तत्त्वाचा विस्तार करत एसबीआय लाइफ सांस्कृतिकदृष्ट्या सुसंगत कथानक तयार करण्यावर, ग्राहकांसोबत भावनिक नाते अधिक दृढ करण्यावर आणि आर्थिक संरक्षण अधिक सोपे व सुलभ बनवण्यावर भर देईल. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर, तसेच विविध भागांमध्ये आर्थिक संरक्षण अधिक सोपे आणि सहज उपलब्ध करून देणे, यावर विशेष लक्ष राहील.

त्याचबरोबर नवकल्पना, डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर आणि ग्राहककेंद्रित उपाययोजना यांवर भर देत नव्या, महत्त्वाकांक्षी भारताच्या गरजांशी सुसंगत सेवा विकसित केल्या जातील. संरक्षणाची गती आणि लोकांच्या स्वप्नांची गती यांत ताळमेळ राखणे, हेच उद्दिष्ट असेल.

थोडक्यात सांगायचे तर, देशातील प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक कुटुंबाच्या प्रगतीला चालना देणारे प्रेरणास्थान बनणे, हीच एसबीआय लाइफची भावी दिशा आहे.

**श्री. रवींद्र शर्मा, प्रवक्ता: ब्रँड, कॉर्पोरेट कम्युनिकेशन आणि सीएसआर प्रमुख**

# स्कोडा ऑटो इंडियाची विक्रमी झेप; पहिल्या तिमाहीत आतापर्यंतची सर्वोच्च विक्री

छत्रपती संभाजीनगर: स्कोडा ऑटो इंडियाने २०२६ वर्षाची सुरुवात दमदार कामगिरीने केली आहे. जानेवारी ते मार्च २०२६ या पहिल्या तिमाहीत कंपनीने २०,०२८ युनिट्सची विक्री करत आतापर्यंतच्या सर्वाधिक तिमाही विक्रीची नोंद केली आहे. गेल्या वर्षी याच काळात हा आकडा १७,१३८ होता, म्हणजेच कंपनीने १७ टक्क्यांची उल्लेखनीय वाढ नोंदवली आहे.



विक्रमी यशाची प्रमुख कारणे:

* स्कोडा काइलॅक: ५०,००० विक्रीचा टप्पा ओलांडून या मॉडेलने बाजारात आपली पकड मजबूत केली आहे.

* उत्पादन श्रेणी: नवीन 'कुशाक'ची ओळख, 'स्लाविया'चे स्थिर योगदान आणि प्रीमियम सेगमेंटमध्ये 'कोडियाक'ला मिळणारी सातत्यपूर्ण मागणी.

* विस्तारित नेटवर्क: १८० पेक्षा अधिक शहरांत ३३० कस्टमर टचपॉइंट्समुळे ग्राहकांपर्यंत पोहोचणे सोपे झाले आहे.

ब्रँड संचालक आशिष गुप्ता यांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, "ग्राहक-केंद्रित उपक्रम आणि सुलभ उत्पादन श्रेणीमुळे आम्ही हे यश मिळवू शकलो. 'स्कोडा सुपर केअर' अंतर्गत दिली जाणारी ४ वर्षांची स्टँडर्ड वॉरंटी आणि पारदर्शक सेवा यामुळे ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे."

या कामगिरीमुळे भारतीय बाजारपेठेत स्कोडाची गती अधिक वेगवान झाली असून, २०२६ हे वर्ष कंपनीसाठी मैलाचा दगड ठरण्याची शक्यता आहे.

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क. ७२/२०२६

अर्जदारः- १. मंगलाबाई अशोक काकडे, वय ७२ वर्षे धंदा शेती, रा. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. राहुल अशोक काकडे, वय ४७ वर्षे, धंदा शेती रा. वरीलप्रमाणे. ३. दिपक अशोक काकडे, वय ४२ वर्षे, भंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४. अभय अशोक काकडे, वय ४० वर्षे, भंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूध्द

गैरअर्जदारः- निरंक

प्रकरण :वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. आर. ए. गिरी, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत अशोक रामचंद्र काकडे हे दि. ३०/०९/२०२५ रोजी आमखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ४ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क. १ ते ४ हे मयत अशोक रामचंद्र काकडे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख - ८/०५/२०२६.

आज दि. ०७/०४/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क. ६१/२०२६

अर्जदार:-१. राजमतीबाई भुजंगराव बोरसे, वय ५२ वर्षे धंदा शेती, रा. करजगांव, पो. पिंपळगांव रेणुकाई, ता. भोकरदन, जि. जालना. २. यशोदाबाई आनंदा दळवी, वय ४९ वर्षे, धंदा शेती रा. दानापुर, ता. भोकरदन, जि. जालना. ३. भगवान पाटीलया जंजाळ, वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. सावरखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, ४. कृष्णा पाटीलया जंजाळ, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. सावरखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदारःनिरंक

प्रकरण :वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. आर. ए. गिरी, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत पाटीलबा तुळशीराम जंजाळ हे दि. १४/१२/२०२५ रोजी छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ४ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क. १ ते ४ हे मयत पाटीलबा तुळशीराम जंजाळ यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ०२/०५/२०२६.

आज दि. ०७/०४/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

**जाहीर प्रगटन**

**मे. दिवाणी न्यायाधीश साहेब (क. स्तर) गंगापूर यांचे न्यायालयात**

सिव्हील एम्.ए. क्र. २१०/२०२६

अर्जदार : १) संजय पिता रामचंद्र सुदामे, वयः ५९ वर्षे, धंदाः- शेती, रा. जैन मंदीराजवळ, लक्ष्मी कॉलनी, गंगापूर, जि. औरंगाबाद २) आदित्य पिता संजय सुदामे, वयः ३२ वर्षे, धंदाः नोकरी, रा. वरील प्रमाणे

विरुद्ध

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते कि, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अँड. श्री पी.डी. देशपांडे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सदर केला असून त्यातील कथन की, अर्जदार क्र. १ यांचे वडील नामे रामचंद्र विष्णुपंत सुदामे हे दि. २२/१२/२०२२ रोजी व आई नामे इंदिरा भ्र. रामचंद्र सुदामे ह्या दि.१७/०३/२०२५ व पत्नी नामे मोहिनी भ्र. संजय सुदामे ह्या दि.३०/०१/२०२४ रोजी मयत झालेले अर्जदार नं. २ हा अर्जदार नं. १ चा व मयत मोहिनी भ्र. संजय यांचा मुलगा असून सर्व मयतास अर्जदारांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाही म्हणून त्यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकामी विनंती केली आहे.

त्याआर्थी सर्व जनतेस सूचित करण्यात येते की सदर प्रकरणाशी कोणाचाही काही उजर किंवा आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचा उजर किंवा आक्षेप हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात वैयक्तिक किंवा त्यांचे विधीज्ञांमार्फत नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर किंवा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांचे विनंती प्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र जारी करेल. करिता हे जाहीर प्रगटन आज दि. ०२/०४/२०२६ आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख १०/०६/२०२६

कनिष्ठ लिपिक. | सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय (क. स्तर) गंगापूर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### सेलू येथे तालुका पेन्शनर्स असोसिएशनतर्फे पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा सत्कार

**सेलू,/प्रतिनिधी-** विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून पुरस्कार प्राप्त केलेल्या मान्यवरांचा रविवार ५ एप्रिल रोजी येथील तालुका पेन्शनर्स असोसिएशनच्या वतीने सत्कार करण्यात आला.

असोसिएशनच्या विसावा सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष डॉ. शरद कुलकर्णी हे होते. यावेळी सचिव नारायणराव इक्कर तसेच सत्कारमूर्ती म्हणून डॉ. एस. एम. लोया, नंदकिशोर बाहेती, निशिकांत पाटील, महादेव अगजाळ, प्रकाश धामनगावकर, बळवंतराव देशपांडे आणि कालिदासराव जोशी सावरगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कै. सखरामपंत मुळे व कै. जयसिंगराव पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर संघटनेच्या विविध उपक्रमांचा कार्यअहवाल गौतम सूर्यवंशी यांनी सादर केला. सचिव नारायणराव इक्कर यांनी जमाखर्चाचा अहवाल मांडला, तर रवींद्र मुळावेकर यांनी सदस्यांच्या वाढदिवसांची यादी वाचन करून दाखवली. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. जीवन गौरव पुरस्कार प्राप्त डॉ. एस. एम. लोया, उत्कृष्ट निर्यात उद्योजक पुरस्काराने गौरविण्यात आलेले कोहिनूर रोपचे उद्योजक नंदकिशोर बाहेती, महिला सक्षमीकरणासाठी विशेष कार्य केल्याबद्दल राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त शुभंकरोती फाऊंडेशनचे निशिकांत पाटील, तसेच उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार प्राप्त महादेव अगजाळ यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना डॉ. एस. एम. लोया, नंदकिशोर बाहेती आणि निशिकांत पाटील यांनी संघटनेच्या कार्याचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांच्या कार्याची दखल घेतल्याबद्दल त्यांनी असोसिएशनचे आभार मानले. कालिदासराव जोशी यांनीही वाढदिवसाच्या अभिष्टचिंतनाबद्दल संघटनेचे आभार व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. शरद कुलकर्णी यांनी सांगितले की, पेन्शनर्स भवनात विविध दर्जेदार कार्यक्रम आयोजित करण्याचा संघटनेचा संकल्प आहे. सदस्यांचे वाढदिवस साजरे करून आनंद वाटण्याची परंपरा जपली जात असून, सर्व पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे अभिनंदन करत त्यांचा सन्मान करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ए. टी. कुलकर्णी यांनी केले, तर सुनील कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### सेलू बाजार समितीत लवकरच हळद बीट सुरू होणार; शेतकऱ्यांना दिलासा

**सेलू,/प्रतिनिधी :** सेलू कृषी उत्पन्न बाजार समितीने तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, लवकरच बाजार समिती अंतर्गत हळद बीट (हळद लिलाव प्रक्रिया) सुरू करण्याबाबत सकारात्मक हालचाली सुरू आहेत. या निर्णयामुळे सेलू तालुक्यातील हळद उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

आतापर्यंत हळद विक्रीसाठी शेतकऱ्यांना इतर बाजारपेठांकडे धाव घ्यावी लागत होती. त्यामुळे वाहतूक खर्च वाढणे तसेच वेळेचा अपव्यय होणे अशा अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र, स्थानिक पातळीवरच हळद विक्रीची सुविधा उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांचा खर्च कमी होऊन त्यांना योग्य व स्पर्धात्मक दर मिळण्यास मदत होणार आहे. सदर बाजार समितीत यापूर्वी कापसाला चांगल्या दराने खरेदी होत असल्याने शेतकऱ्यांचा विश्वास आधीच दृढ झाला आहे. त्याच धर्तीवर हळद बीट सुरू झाल्यास बाजारपेठ अधिक सक्षम व गतिमान होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

या उपक्रमासाठी बाजार समितीचे सभापती डॉ. संजय रोडगे तसेच सर्व संचालक मंडळ सक्रियपणे प्रयत्न करत आहेत. बाजार व्यवस्थापनाची आवश्यक तयारी, व्यापाऱ्यांशी समन्वय आणि पायाभूत सुविधा उभारणी यावरही भर दिला जात आहे. तसेच सर्व व्यापारी बांधवांना आवाहन करण्यात आले आहे की, हळद खरेदी प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी लवकरात लवकर नावनोंदणी करावी. यामुळे बाजारात स्पर्धात्मक वातावरण निर्माण होऊन शेतकऱ्यांना अधिक चांगला दर मिळण्यास मदत होईल. शेतकरी व व्यापारी यांच्या परस्पर सहकार्याने हा उपक्रम निश्चितच यशस्वी ठरेल, असा विश्वास बाजार समितीचे सभापती डॉ. संजय रोडगे यांनी व्यक्त केला आहे.

### गुरुवारी महापालिकेची विशेष सर्वसाधारण सभा

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या वतीने गुरुवार ९ एप्रिल रोजी दुपारी २.३० वाजता वसमत रस्त्यावरील बी. रघुनाथ सभागृहात विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती नगर सचिव विकास रत्नपारखे यांनी दिली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची 'ड' प्रकरण-२ मधील नियम क्रमांक १ ड (एच) अन्वये ही सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेस महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा, उपमहापौर गणेश देशमुख तसेच आयुक्त नितीन नार्वेकर उपस्थित राहणार आहेत.

सभेच्या कार्यक्रम पत्रिका क्र. ०३ नुसार विविध महत्त्वाचे विषय चर्चेसाठी ठेवण्यात आले आहेत. यामध्ये विषय क्र. ०६ अंतर्गत महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २०(२) अन्वये स्थायी समितीच्या एकूण १६ सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. सुधारित कलम ३१-अ नुसार महापालिकेतील पक्ष किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिले जाणार आहे. तसेच विषय क्र. ०७ अंतर्गत दि. ४ ऑगस्ट २०१२ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. ८ नुसार स्थापन करण्यात आलेल्या विशेष समितीवर सदस्य नियुक्तीचा विषयही चर्चेसाठी समाविष्ट करण्यात आला आहे. प्रस्तावित सभेस सर्व संबंधितांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### झरीजवळ कारने दिलेल्या धडकेत दोघे मोटारसायकलस्वारांचा जागीच मृत्यू : मंगळवार दुपारची दुर्दैवी घटना

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी ते जिंतूर या महामार्गावर झरी जवळली कालव्या लगत एका कारने दिलेल्या जोरदार धडकेत मोटारसायकलवरील दोघा बहिण-भावाचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना मंगळवारी दुपारी घडली.

एम.एच.३८ टी. २२३१ या क्रमांकाच्या मोटारसायकलवर सेनगाव तालुक्यातील वटकळी येथील राम महादेव व्यवहारे व शितल महादेव व्यवहारे हे दोघे बहिण-भाऊ परभणीहून जिंतूरकडे निघाले होते. त्यावेळी जिंतूरहून झरीकडे जाणारी एच.आर.२६ डी.एफ. ७८९० या क्रमांकाच्या भरधाव कारच्या वाहनचालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने कारने या मोटारसायकलला जोरदार धडक दिली. त्यात दोघा बहिण-भावाचा मृत्यू झाला.दरम्यान परभणी जिल्हयात गेल्या काही दिवसापासून अपघाताच्या प्रमाणात चांगलीच वाढ झाली आहे. त्यामुळे या अपघातावरील नियंत्रण मिळवण्यासाठी आपण योग्य अशी कारवाई करण्यास पुढे धजावत नाहीत त्याचा परिणाम सर्व नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्यामुळे याप्रकाराकडे वाहतुक शाखेच्यावतीने लक्ष देण्याची गरज आहे.

# माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव'' राज्यव्यापी अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

**परभणी,/प्रतिनिधी -** जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या ''माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव'' या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. राज्य शासनाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे. या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित



करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठरावीक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना ''आरोग्यसंपन्न गाव'' म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

''माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव'' हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

## भारतीय जनता पार्टी स्थापना दिवस उत्साहात

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णा शहरात भारतीय जनता पक्ष आपल्या जनसेवेची आणि राष्ट्र सेवेची ४६ वर्ष पूर्ण करतोय. यानिमित्त भाजपाच्या वतीने शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
शहरांमध्ये भाजपा शहर मंडळाच्या वतीने शहरातील मध्यवर्ती ठिकाण स्वातंत्र्यवीर सावरकर चौक आनंदनगर येथे फटाक्याची आतिषबाजी करत भारतीय जनता पक्षाचे ध्वजारोहन करून स्थापना दिवस जल्लोषात साजरा करण्यात आला यावेळी भाजपा मंडळ अध्यक्ष गोविंद ठाकर, नगरसेवक लक्ष्मीकांत कदम,भगवान सोळंके,माजी नगरसेवक चंद्रकांत टाकळकर , प्रशांत कापसे ,मधुकर मुळे,बालाजी कदम,अविनाश मित्रे,महेश किरडे, विजय खिलोशिया,महिला सह आदी पदाधिकारी यांच्या हस्ते भारतमाता व पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . त्यांनतर मिठाईचे वाटप करण्यात आले यावेळी कार्यक्रमास पूर्णा शहर मंडळातील आजी-माजी पदाधिकारी नगरसेवक, पदाधिकारी आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .






## भक्तीच्या सोहळ्यात पर्यावरणाचं तीर्थ; सिमुरगव्हाणची प्लास्टिकविरोधी क्रांती!

**पाथरी,/प्रतिनिधी:** धार्मिक कार्यक्रमां म्हटलं की चहाचे प्लास्टिक कप, जेवणावळीतील प्लास्टिक पत्रावळ्या, द्रोण, ग्लास यांचा खच डोळ्यांसमोर येतो. मात्र पाथरी तालुक्यातील सिमुरगव्हाण या गावाने या परंपरेला छेद देत एक नवा आदर्श निर्माण केला आहे. गावात आयोजित अखंड हरिनाम सप्ताह आणि फिरत्या ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यामध्ये गावकऱ्यांनी प्लास्टिकला पूर्णपणे फाटा दिला असून, हा सोहळा आता पर्यावरणपूरक भक्तीचा एक अनोखा संगम ठरतोय!

काय आहे सिमुरगव्हाण मॉडेल?

स्वतःचे ताट, स्वतःचा पेला!

आचार्य महामंडलेश्वर १००८ स्वामी मनीषानंद पुरीजी महाराज यांचे शिष्य हभप पंडित महाराज डाके यांनी या उपक्रमाची संकल्पना मांडल्यानंतर गावकऱ्यांनी उत्साहात होकार दिला. या उपक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे पारायण सोहळ्यासाठी गावोगावी फिरणारे आयोजक मंडळ आपल्यासोबत स्वतःची स्टीलची ताटे, ग्लास घेऊनच प्रवास करतात. यामुळे कार्यक्रमाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या डिस्पोजेबल वस्तूंचा वापर टाळला जातो. स्थानिक नागरिकही या मोहिमेत हिरिरीने सहभागी झाले आहेत.

श्रमदानातून मानधनाची पूर्तता

कार्यक्रमाचे आणखी एक वेगळेपण म्हणजे येथील पाकीटमुक्त संस्कृती. कीर्तनकार आणि महाराजांना दक्षिणेच्या पाकिटाऐवजी श्रमाची आणि अन्नाची भेट दिली जाते. माणसाने माणसाशी माणसासारखं वागावं आणि निसर्गाचा सन्मान करावा, हा ज्ञानेश्वरीतील विचार हे गाव प्रत्यक्ष कृतीत आणत आहे. गावातील महिला, तरुणांच्या सक्रिय सहभागामुळे हा सोहळा स्वच्छता उत्सव बनला आहे.

## विद्यार्थी व्यक्तिमत्व प्रभावी करण्यासाठी शालेय उपक्रम आवश्यक -अजिंक्य नखाते

**परभणी,/प्रतिनिधी-** विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील ज्ञानासोबतच जगातील इतर घडामोडीचे सामान्य ज्ञान तसेच विज्ञानाची पायाभूत संकल्पना व गणितीय सूत्राचे उपयोजन अवगत करणे आवश्यक आहे यासाठी शाळांनी विविध स्पर्धा परीक्षात्मक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी करावे असे मत जिल्हा परिषद परभणीचे सदस्य तथा वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ परभणीचे संचालक अजिंक्य नखाते यांनी व्यक्त केले

मंगळवार दि. ७ एप्रिल २०२६ रोजी शांताबाई नखाते प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाथरी ता. पाथरी येथे पारितोषिक वितरण व वासंतिक वर्ग उद्घाटन समारंभाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी रोहिदास टेंगसे तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी डॉक्टर अजय तोर तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये मुख्याध्यापक एन.ई. यादव, के.एन.डहाळे, प्राचार्य आर व्ही कांबळे, उपमुख्याध्यापक एन एस जाधव पी.एस खरात आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना मेडल ,शील्ड व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले विद्यालयातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मुख्याध्याक एन ई यादव, सहशिक्षक बळीराम चव्हाण,श्रीमती सीमा पवार, श्रीमती मनीषा कुलकर्णी, यांचा तर शिक्षकेतर कर्मचारी प्रकाश घाटूळ यांना शाळा रत्न या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आम्ही येथे घडलो या उपक्रमांतर्गत शाळेचे माजी विद्यार्थी डॉक्टर अजय अतुल यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

ओलंपियाड एक्झाम मध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. ऑलिंपियाड विभागाचे अहवाल वाचन माणिक शिंदे यांनी केले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक एन.ई यादव यांनी केले. उपस्थितांना प्रशासकीय अधिकारी रोहिदास टेंगसे, मुख्याध्यापक के एन डहाळे प्राचार्य आर व्ही कांबळे यांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बळीराम चव्हाण व असाराम सोनवणे यांनी तर आभार प्रदर्शन प्रभाकर जाधव यांनी केली कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने कार्य करण्यात आले. कार्यक्रमास विद्यार्थी पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोनपेठात जय श्रीराम गोशाळेस महिलांकडून कडबा दान

**सोनपेठ ,/प्रतिनिधी:** जय श्रीराम गोशाळेस महिलांकडून कडबा दान करण्यात आला होता.

तालुक्यातील सायखेडा येथील जय श्रीराम गोशाळेस प्रत्येक वर्षी विविध गोसेवकांकडून चाऱ्यासाठी मदत केली जाते. यावेळी सोनपेठ येथील राजस्थानी बीसी ग्रुपच्या सर्व महिला भगिनींनी गोमाते करिता ज्वारीच्या ७०० पेंड्यांचा कडबा गोशाळेतील चारा संकलनामध्ये जमा केला आहे. त्यांच्या या कार्याची सर्व स्तरातून प्रशंसा केली जात आहे. मागील अनेक वर्षांपासून सोनपेठ तालुक्यातील सायखेडा येथे हभप काका महाराज कदम हे गोशाळा चालवतात.त्यांनी आपले संपूर्ण जीवन गोसेवेसाठी समर्पित केले आहे.त्यांच्या गो शाळेत सध्या तिनशे पेक्षा जास्त गाई-वासरे आहेत.या गाईंच्या व्यवस्थापनासह चाऱ्याचा खर्च वर्षाकाठी लाखो रुपयांच्या घरात जातो.त्यासाठी खर्च उचलणारे अनेक गोभक्त जय श्रीराम गोशाळेस जुडलेले आहेत.मुख्यता सामाजिक कार्यामध्ये नेहमीच अग्रेसर असलेल्या श्री रंगनाथ महाराज प्रतिष्ठानचा या गोशाळेच्या सेवेसाठी मोठा सिंहांचा वाटा आहे. यावेळी राजस्थानी बीसी महिला मंडळांनी सोमवार दिनांक ६ एप्रिल रोजी गोशाळेवर येऊन टरबूज, फळे, हिरवा चारा, डाळ, गुळ यासारखे अनेक पदार्थ गोमातेला खाऊ घातले. तसेच गोशाळेवर खूप वेळ चालू असलेले गोसेवेचे कार्य पाहून समाधान व्यक्त केले. जाते चारा संकलनासाठी प्रत्येक वर्षी खरिपाचे सोयाबीन,तुर, आदी पिकांची मळणी झाली की, निघालेला भुसा (गुळी) शेतकऱ्यांच्या शेतावरुन खरेदी अथवा देणगी स्वरुपात गोशाळेत आणले जाते.तसेच रब्बी हरभरा भुस्सा,ज्वारी बाजरी चा कडबा व भुस्सा याच प्रकारे गोळा करून आणला जातो.गोशाळेमध्ये वर्षभराचा चारा साठवणूकीसाठी मोठे शेड तयार केले आहे.तसेच चारा गोळा करण्यासाठी एक ट्रॅक्टर सुद्धा आहे.

काही गो भक्त चाऱ्यासाठी मासीक व वार्षिक पद्धतीने रोख रक्कम देणगी म्हणून देत आहेत.दिवसेंदिवस भाकड गाईंची संख्या वाढत चालली असून त्यांना जगविण्यासाठी चारा कमी पडत आहे.यासाठी परिसरातील गो भक्तांनी कडबा पेंढ्या, सोयाबीन,तुर, ज्वारी ची गुळी गोशाळेस भेट देऊन गोसेवा करावी असे आवाहन गोशाळा चालक हभप काका महाराज कदम यांनी केले आहे.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# परंपरेला पाने पुसणे

आजकाल युद्ध ही केवळ दोन देशांच्या सीमेवरची लढाई राहिलेली नाही. त्याचे परिणाम अन्य अनेक देशांना भोगावे लागतात, तेव्हा त्या देशांच्या सामाजिक, राजकीय धैर्याची, स्थैर्याची आणि एकतेची कसोटी असते. स्वातंत्र्यानंतर जेव्हाजेव्हा अशा कोणत्याही युद्धकाळास सामोरे जाण्याची वेळ भारतावर आली, तेव्हा तेव्हा भारताची परंपरा नेहमीच समन्वयाची राहिली आहे. आज मात्र जागतिक स्तरावर दाटलेले युद्धस्थितीसारखे संकट ही भारताच्या दृष्टीने अंतर्गत राजकीय संघर्षाची स्थिती वाटावी असे दिसत आहे. इराण आणि अमेरिका-इस्रायलमधील संहारक युद्धामुळे जगातील अनेक देशांचे कंबरडे मोडले आहे. अनेक देशांचे अर्थकारण लयास गेले आहे आणि ऊर्जा सुरक्षिततेचे गंभीर संकट अनेक देशांवर लादले गेले आहे. अशा परिस्थितीचे चटके भारतातही कमी-अधिक प्रमाणात अपरिहार्य आहेत, पण तरीही, भारताने या परिस्थितीस सामोरे जाताना स्वीकारलेल्या राजनैतिक, सामाजिक आणि परराष्ट्र धोरणविषयक नीतीमुळे अन्य अनेक देशांच्या तुलनेत भारताची स्थिती काहीशी दिलासादायक ठरली आहे. जगातील किंवा भारताच्या शेजारचे अनेक देश या युद्धस्थितीत पुरते कोलमडून गेले आहेत; ते पाहता, स्थैर्य आणि संयमाच्या कसोटीच्या क्षणी समाज आणि राजकीय पक्षांनी ऐक्याचे दर्शन घडविण्याची लोकशाहीची परंपरा जपावयास हवी. याआधी जेव्हा अशी संकटे ओढवली, तेव्हा सत्ताधारी आणि विरोधकांनी सहकार्याच्या आणि देशहिताच्या भावनेने त्यास सामोरे जाण्यासाठी हातात हात घातले. आज या इतिहासाची आठवण करून देण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण परंपरेचा विसर पडल्यास काय होते, ते आता जाणवू लागले आहे. लोकशाहीत विरोध असणे स्वाभाविक असले, तरी तो विरोध राष्ट्रहिताच्या आड येता कामा नये. जागतिक अपरिहार्यतेमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीशी युद्ध करताना, देशातील राजकीय पक्षांनी राजकीय युद्ध थांबवून राष्ट्रीय सामर्थ्य बनले पाहिजे, त्यातच देशाचे खरे हित आहे, ही बाब अधोरेखित करण्याची वेळ आली आहे.

भारतासारख्या विशाल लोकशाहीत राजकीय मतभेद हे चैतन्याचे लक्षण मानले जाते. परंतु जेव्हा विषय राष्ट्रीय सुरक्षेचा आणि सीमेवरील युद्धाचा येतो, तेव्हा हे मतभेद गळून पडणे ही भारताची प्रदीर्घ परंपरा राहिली आहे. इराण-अमेरिका युद्धाच्या संदर्भातही, भारताच्या राजकीय परंपरेचा आणि सद्य:स्थितीचा आढावा घेणे अनिवार्य ठरते. १९६२ च्या भारत-चीन युद्धकाळात किंवा १९७१ च्या बांगला मुक्ती युद्धकाळात सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमुखाने एक राष्ट्र, एक आवाज या सूत्राचे पालन केले. १९७१ मध्ये जेव्हा भारतीय सैन्याने शौर्य गाजवले, तेव्हा तत्कालीन विरोधी पक्षनेते अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे संसदेत केलेले कौतुक हे भारतीय लोकशाहीच्या सुवर्णकाळाचे उदाहरण आहे. त्यावेळी विरोधकांनी सरकारला धोरणात्मक प्रश्न विचारले, पण लष्कराच्या कर्तृत्वावर किंवा सरकारच्या हेतूवर शंका उपस्थित करून देशाला कमकुवत केले नाही. आज लष्करी कारवायांचे राजकीय भांडवल करण्याच्या किंवा त्या विजयाचे श्रेय देण्याघेण्याच्या राजकारणापायी विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये राजकीय युद्धे भडकताना दिसतात. राजकीय प्रचाराच्या मंचावरून सरकारच्या विदेश नीतीविषयी सामान्य जनतेत संभ्रम पसरविणाऱ्या मोहिमा चालविणे ही एक नवी प्रवृत्ती बळावत चालली आहे.

इराण आणि अमेरिका-इस्रायल युद्धामुळे उद्‌भवलेली परिस्थिती चिंताजनक आहे. आधुनिक ऊर्जेच्या इतिहासात जगाने अशा प्रसंगाचा कधीही सामना केलेला नाही. जगातील २० टक्के कच्चे तेल, २० टक्के नैसर्गिक वायू आणि २० टक्के एलपीजीची वाहतूक जेथून होते, ती होर्मुझची सामुद्रधुनी विस्कळीत झाली आहे. या संघर्षाला कारणीभूत ठरण्यात भारताची कोणतीही भूमिका नसतानाही इतर अनेक देशांप्रमाणे भारतालाही याचा कमी-अधिक प्रमाणात सामना करावा लागत आहे. मात्र, अन्य अनेक देशांतील स्थिती पाहता, भारत अजूनही सुस्थितीत आहे यात शंका नाही. शेजारच्या एका देशाने सर्व शाळा काही काळाकरिता बंद केल्या, सरकारी कार्यालयांच्या कामकाजाचे दिवस कमी केले, सरकारी वाहनांच्या इंधन भत्त्यात कपात केली, कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची मुभा दिली. या देशात इतिहासातील सर्वांत मोठी इंधन दरवाढ झाली. दक्षिण-पूर्व आशियातील अनेक देशांना इंधनाचे रेशनिंग करावे लागले. हे पाहता, भारताची कच्च्या तेलाची पुरवठा स्थिती सुरक्षित आहे. विस्कळीत झालेल्या होर्मुझ सामुद्रधुनी मार्गावरून भारताला होणारा कच्च्या तेलाचा पुरवठा सुरळीत आहे. कच्च्या तेलाची अंतर्गत उत्पादनस्थितीही वाढली आहे. तेल शुद्धीकरण प्रकल्प उच्च क्षमतेनिशी कार्यरत आहेत. देशात काही ठिकाणी केवळ अफवा आणि अपप्रचारामुळे गॅस मागणी वाढून पुरवठा साखळी विस्कळीत झाली आणि मागणी-पुरवठ्याचा समन्वय साधण्याकरिता उपाययोजना कराव्या लागल्या. काळाबाजार, नफेखोरीसारख्या अपप्रवृत्ती वाढल्या, पुरवठ्यावर मर्यादा असल्याने जनतेमध्ये चिंतेचे वातावरण पसरले, पण तातडीच्या उपाययोजनांद्वारे जागतिक बाजारपेठांचा दबाव टाळण्यात सरकारला बरेचसे यश मिळाले आहे. खरे म्हणजे, ही अफवा पसरविण्याची, संभ्रम माजविण्याची किंवा राजकीय हिशेब चुकते करण्याची वेळ नाही. समाजाचा कोणताही घटक कोणत्याही राजकीय विचारधारेचा असला तरी संकटाचा सामना करताना एकोपा राखण्यात देशाचे हित सामावलेले आहे. सर्व ऊर्जायोद्ध्यांच्या, संकटाचे व्यवस्थापन करणाऱ्या यंत्रणांच्या आणि राष्ट्रीय हिताच्या पाठीशी एकत्रितपणे उभे राहण्याची ही वेळ आहे. पण विरोधी पक्षाचे जबाबदार मानले जाणारे नेते मात्र या परिस्थितीचा राजकीय फायदा उठविण्यासाठी कंबर कसून प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. देशाच्या आर्थिक आणि राजनैतिक सामर्थ्याची कसोटी पाहणाऱ्या या काळात भारताने ज्या संयमाने वाटचाल सुरू ठेवली आहे, ते पाहता भारत ही एक लवचीक जागतिक शक्ती म्हणून उभी राहत आहे. सध्याचे जागतिक संघर्ष, कोविड महामारीचे संकट किंवा हवामान बदल ही संकटे म्हणजे गेल्या दशकभरातील वाटचालींसमोरील मोठी आव्हाने होती. या सर्व धक्क्यांमधून यशस्वीपणे बाहेर पडून भारताने आपल्या अर्थकारणाचे जागतिक स्थान भक्कम केले आहे. म्हणूनच विरोधकांनी देशाच्या राजकीय परंपरेचे पालन करावयास हवे. इराण-अमेरिका संघर्षात भारतात याची गरज असताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी मात्र, निवडणूक प्रचारसभांमध्ये पंतप्रधानांवर वैयक्तिक हल्ले चढवून त्यांच्या प्रतिमाहननाच्या ट्रम्पप्रणीत मोहिमेचे शिलेदार होऊ पाहात आहेत. काँग्रेसमध्ये राहुल गांधी यांच्या या भूमिकेस पाठिंबा देण्यावरून दुफळी दिसू लागली, ही बाब परंपरेच्या कसोटीस मोठा दिलासा देणारी ठरेल. कमलनाथ, शशी थरूर, आनंद शर्मा आणि मनीष तिवारी यांच्यासारख्या नेत्यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाचे कौतुक केले आहे. भारताची भूमिका परिपक्व आणि कुशल असल्याचा दाखला हे नेते देत असताना, राहुल गांधी इंधन समस्येचा बागुलबुवा उभा करून सरकारवर चुकीच्या परराष्ट्र धोरणाचा ठपका ठेवत संभ्रम पसरवू पाहात आहेत.

हे खरे आहे की आजच्या सोशल मीडियाच्या युगात माहितीचा प्रवाह कमालीचा वेगवान झाल्यामुळे अफवा आणि वास्तविकता यातील रेषा धूसर झाली आहे. एकमेकांवरील चिखलफेकीमुळे राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश अनेकदा क्षीण होतो. देशांतर्गत राजकीय पक्षांत, विशेषतः जेव्हा राजकीय ऐक्याची गरज असते, तेव्हाच सत्ताधाऱ्यांना सहकार्य करण्याऐवजी, अस्थिरतेतून सावरण्याच्या प्रयत्नांवर टीका करण्याची चढाओढ लागणे, हे लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक आहे. म्हणूनच, सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यातील सुसंवाद ही आजची गरज आहे. आंतरराष्ट्रीय कारणांच्या अपरिहार्यतेमुळे उद्‌भवणाऱ्या परिस्थितीत राजकारण न करण्याची भारताची परंपरा आज धूसर झाली आहे. लोकशाहीत सरकारला जाब विचारणे हा विरोधकांचा हक्क आहे; मात्र राष्ट्रहिताच्या मुद्यावर जेव्हा राजकारण हे देशाच्या प्रतिमेपेक्षा मोठे होते, तेव्हा ती चिंतेची बाब ठरते. लोकशाहीत 'टीका' हा हक्क असला, तरी 'राष्ट्रहित' हा नेहमीच वादाच्या पलीकडचा विषय मानला गेला आहे. म्हणूनच, परंपरेची आठवण करून देण्याची गरज आहे.

## आंतरराष्ट्रीय

प्रा. जयसिंग यादव

# ट्रम्प यांचा क्युबावर डोळा का?

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या परराष्ट्र धोरणाकडे पाहिले असता एक स्पष्ट पॅटर्न दिसून येतो, तो म्हणजे ज्या देशांनी अमेरिकेच्या प्रभावाला आव्हान दिले किंवा तिच्या पारंपरिक प्रभाव क्षेत्रात असूनही स्वतंत्र धोरणे राबवणाऱ्या देशांवर ट्रम्प दबाव आणतात. इराण आणि व्हेनेझुएलानंतर आता क्युबाच्या संदर्भात वाढत चाललेली आक्रमक भूमिका ही याच धोरणाचा भाग मानली जात आहे. प्रश्न असा आहे की, क्युबावर लक्ष केंद्रित करण्यामागे नेमका उद्देश काय आहे आणि या सर्व प्रक्रियेत अमेरिका कोणाला शह देऊ पाहते आहे? क्युबा हा देश भौगोलिकदृष्ट्या अमेरिकेच्या अगदी जवळ असला तरी राजकीयदृष्ट्या अनेक दशकांपासून अमेरिकेच्या विरोधात उभा राहिला आहे. फिडेल कॅस्ट्रो यांच्या नेतृत्वाखालील क्रांतीनंतर क्युबाने समाजवादी मार्ग स्वीकारला आणि अमेरिकेचा वरचष्मा नाकारला. परिणामी, शीतयुद्धाच्या काळात क्युबा हा सोव्हिएत युनियनचा महत्त्वाचा सहयोगी बनला. ही ऐतिहासिक पृष्ठभूमी आजही अमेरिकेच्या धोरणांवर प्रभाव टाकताना दिसते. आजच्या घडीला क्युबा हा केवळ एक लहान देश नाही, तर अमेरिकेसाठी एक प्रतीकात्मक आणि रणनीतिक आव्हान आहे. क्युबातील विद्यमान व्यवस्थेला कमकुवत करून अमेरिकेस अनुकूल सरकार आणल्यास हा देशच नव्हे, तर संपूर्ण लॅटिन अमेरिकेत अमेरिकेचा प्रभाव पुन्हा मजबूत होऊ शकतो. कदाचित म्हणूनच आता अमेरिकेचा क्युबावर डोळा आहे.

व्हेनेझुएलाचा विचार केल्यास निकोलस मादुरो यांच्या सरकारविरोधात अमेरिकेने उघड भूमिका घेतली होती. आर्थिक निर्बंध, राजकीय दबाव आणि या देशाला आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी करण्याचे प्रयत्न हे त्याचे स्पष्ट उदाहरण आहे. त्याचप्रमाणे इराणवरही अमेरिकेने हल्ला केला. यावरून स्पष्ट होते की, अमेरिका अशा देशांना लक्ष्य करते आहे, जे तिच्या धोरणांशी विसंगत भूमिका घेतात; मात्र या सर्व प्रक्रियेच्या मागे केवळ प्रादेशिक राजकारण नाही, तर जागतिक शक्तिसंतुलनाचाही मोठा भाग आहे. क्युबा हा रशिया आणि चीन या दोन्ही देशांसाठी एक महत्त्वाचा भागीदार ठरत आहे. आर्थिक, लष्करी आणि तांत्रिक सहकार्याच्या माध्यमातून या देशांनी क्युबामध्ये आपला प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे क्युबामध्ये अमेरिकेला अनुकूल सत्तांतर घडवून आणणे म्हणजे अप्रत्यक्षपणे रशिया आणि चीनच्या प्रभावाला मर्यादा घालणे होय. अमेरिकेच्या दृष्टीने पाहता ही एक व्यापक रणनीती आहे. त्यात प्रतिस्पर्धी महासत्तांना त्यांच्या प्रभाव क्षेत्रातून दूर ठेवणे आणि स्वतःचे वर्चस्व टिकवून ठेवणे हा उद्देश आहे. विशेषतः व्लादिमिर पुतिन आणि शी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखाली रशिया व चीन अधिक आक्रमक आणि आत्मविश्वासपूर्ण भूमिका घेताना दिसत आहेत. अशा परिस्थितीत, अमेरिकेने लॅटिन अमेरिकेसारख्या आपल्या पारंपरिक प्रभाव क्षेत्रात कोणत्याही बाह्य शक्तीचा हस्तक्षेप सहन न करण्याचा निर्धार केला आहे. आजघडीला क्युबामध्ये सत्तांतर घडवून आणण्याचा अमेरिकेचा कोणताही



प्रयत्न स्थानिक असंतोष, आंतरराष्ट्रीय टीका आणि प्रादेशिक अस्थिरता निर्माण करू शकतो. इतिहासाकडे पाहिले असता बाह्य हस्तक्षेपामुळे अनेकदा परिस्थिती जास्त बिघडलेली दिसते. क्युबावर लक्ष केंद्रित करणे हे केवळ एका देशाविरोधातील कारवाई नाही; तर ती एक व्यापक भू-राजकीय खेळी आहे. इराण, व्हेनेझुएला आणि आता क्युबा या सर्व घटनांमधून अमेरिकेची एकच भूमिका स्पष्ट होते, ती म्हणजे आपल्या जागतिक वर्चस्वाला आव्हान देणाऱ्या शक्तींना रोखणे आणि या प्रक्रियेत रशिया आणि चीन हे निश्चितच अप्रत्यक्षपणे अमेरिकेच्या निशाण्यावर आहेत. या पृष्ठभूमीवर पुढील काळात जागतिक राजकारण अधिक ध्रुवीकरणाकडे झुकण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रश्न एवढाच आहे की या शक्तिसंघर्षात लहान देशांचे भविष्य काय असेल? नवीन वर्षाच्या सुरुवातीला कॅरिबियन प्रदेशात मोठा तणाव निर्माण झाला आहे. ट्रम्प यांच्या आदेशानुसार, अमेरिकेच्या तिन्ही सशस्त्र दलांनी एकाच वेळी व्हेनेझुएलावर मोठा हल्ला चढवला. या अचानक आणि मोठ्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यास व्हेनेझुएला असमर्थ ठरला. या हल्ल्यानंतरची सर्वांत धक्कादायक बातमी म्हणजे व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ताब्यात घेऊन अमेरिकेत नेण्यात आले. या घडामोडीमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भूकंप झाला. व्हेनेझुएलावरील या हल्ल्यानंतर क्युबा सर्वांत मोठ्या धोक्याचा सामना करत आहे.

खरे तर, ट्रम्प यांनी गेल्या वर्षभरात क्युबाला किमान दहा वेळा धमकी दिली आहे. ट्रम्प यांनी पुन्हा एकदा तीच भावना व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले आहे की व्हेनेझुएलानंतर क्युबाचा नंबर लागू शकतो. क्युबाचे अध्यक्ष मिगुएल डियाझ-कॅनेल यांनी देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करत असल्याचा दावा करत या धमक्यांना प्रत्युत्तर दिले आहे. ट्रम्प यांचे हे वक्तव्य अशा वेळी आले आहे, जेव्हा क्युबा एका गंभीर आर्थिक संकटाशी झुंज देत आहे. व्हेनेझुएलाकडून होणारा तेलपुरवठा थांबल्याने येथे इंधनाची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. मादुरो यांच्या अटकेनंतर क्युबाचा प्रमुख ऊर्जा पुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. अमेरिकेचे क्युबासोबतचे वैर सुमारे ६७ वर्षे जुने आहे. १९५९ मध्ये कॅस्ट्रोने क्युबामध्ये क्रांती घडवून सत्ता काबीज केली, तेव्हा अमेरिकन कंपन्यांकडून जमिनी आणि कारखाने जप्त केले आणि सोव्हिएत युनियनशी युती केली. मात्र अमेरिका डगमगली नाही. तिने क्युबावर आर्थिक नाकेबंदी लादली. ती आजही सुरू आहे. अमेरिकेने अनेक वेळा कॅस्ट्रो यांच्या हत्येचे प्रयत्न केले; पण ते अयशस्वी ठरले. १९६२ मध्ये क्युबन क्षेपणास्त्र संकट उद्‌भवले. रशियाने क्युबामध्ये अण्वस्त्रे तैनात केली. त्यामुळे जग अणुयुद्धाच्या उंबरठ्यावर आले. तेव्हापासून अमेरिका क्युबाला साम्यवादी धोका मानत आहे. ओबामांच्या कार्यकाळात काही सुधारणा करण्याचा प्रयत्न झाला; पण ट्रम्प यांनी पुन्हा आपली कठोरता वाढवली. आता क्युबावर अमेरिकेच्या हल्ल्याचे संकट घोंगावत आहे. ट्रम्प जवळपास वर्षभरापासून क्युबाच्या मागे लागले आहेत. यासाठी अनेक कारणे दिली जात आहेत.

ट्रम्प यांचा आरोप आहे की क्युबाचे संबंध नेहमीच रशिया, चीन आणि इराणशी राहिले असून हा देश दहशतवाद्यांना पाठिंबा देत आहे. यामुळेच ट्रम्प वारंवार क्युबावर हल्ला करण्याची धमकी देत आहेत. त्याच वेळी ते जगात शांतता प्रस्थापित करणारे शांतताप्रिय अध्यक्ष असल्याचा दावाही करतात. २९ जानेवारी रोजी ट्रम्प यांनी क्युबा हा अमेरिकेसाठी एक मोठा धोका असल्याचे वर्णन करत क्युबासंबंधी एका कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली. व्हेनेझुएला क्युबाला ऊर्जा पुरवत होता. अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या कारवाईपासून क्युबा ऊर्जासंकटाचा सामना करत असून १६ मार्च रोजी वीजपुरवठा खंडित झाला. त्याचा परिणाम लाखो लोकांवर झाला. गेल्या चार महिन्यांमध्ये तीन प्रमुख वीज प्रकल्पांमध्ये हे संकट गडद झाले आहे. व्हेनेझुएलाकडून मिळणाऱ्या तेल पुरवठ्यात सुमारे ३० टक्के घट झाल्यामुळे क्युबा या संकटाचा सामना करत आहे. क्युबाची अर्थव्यवस्था सुमारे १५ टक्क्यांनी घसरली आहे. इंधन संकटाचा परिणाम वाहतूक आणि उद्योगावर होत आहे. क्युबा बऱ्याच काळापासून तेलाच्या बदल्यात डॉक्टर आणि वैद्यकीय मदत पाठवत आला आहे; परंतु आता हे संतुलन बिघडले आहे. व्हेनेझुएलावरील हल्ला आणि क्युबाबाबतच्या त्याच्या आक्रमक भूमिकेमुळे संपूर्ण लॅटिन अमेरिकेत अस्थिरता वाढली आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाला ताजा तणाव एका मोठ्या लष्करी संघर्षात बदलू शकतो, अशी चिंता वाटत आहे. व्हेनेझुएलानंतर क्युबाविरुद्ध संभाव्य कारवाईच्या संकेतांनी जागतिक राजकारणात नवीन तणाव निर्माण केला आहे. येत्या काही दिवसांमध्ये अमेरिकेची रणनीती आणि क्युबाची प्रतिक्रिया या संकटाची दिशा ठरवेल.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# विनाशाच्या उंबरठ्यावर असलेला पाकिस्तान

आजपर्यंत भारतासोबत केलेल्या सर्वच युद्धांमध्ये पाकिस्तानने सपाटून मार खाल्ला आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये तर भारताने पाकिस्तानात घुसून निर्धारित लक्ष्याचे अवघ्या काही मिनिटामध्ये चिथडे उडविले. एकदा मार खाऊनही बेशरम पाकिस्तानची खुमखुमी अजूनही जिरली नाही. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी सियालकोट येथे कोलकाता शहरावर दिलेल्या हल्ल्याच्या धमकीने संपूर्ण जगाचे लक्ष वेधले गेले असून, नापाक पाकिस्तानच्या अंताचा तर हा अध्याय नाही ना अशी शंका येऊ लागली आहे. ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानी नेत्यांची झोप उडाली होती. हे ऑपरेशन थांबविण्यासाठी त्यांनी अमेरिकेपुढे लोटांगण घातले होते. हे उघड सत्य असून, जगालाही माहीत आहे. त्यामुळे पाकिस्तानने यापुढे कोणतीही केलेली आगळिक त्यांच्या विनाशाचे कारण ठरू शकते. पाकिस्तानी नेते जुन्या भारताची स्वप्नं बघून जर जगत असतील तर त्यांना केवढी मोठी किंमत चुकवावी लागेल, हे त्यांच्या कल्पनाशक्तीच्याही पलिकडे असेल.

संपूर्ण जगामध्ये दहशतवादाचे माहेरघर असलेला पाकिस्तान आज आपल्याच कर्मफळाच्या भोगाने सर्वच आघाड्यांवर मार खात आहे. जगामध्ये भीक मागून देश चालविण्याची पाळी पाकिस्तानवर आली आहे. आपल्या जनतेला दिवसाकाठी एकवेळचे पोटभर अन्न देण्याचीही क्षमता या देशाची राहिली नाही. अमेरिका आणि इराणच्या युद्धानंतर तर पाकिस्तानमध्ये गृहयुद्धासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. देशामध्ये सात दिवस पेट्रोल आणि डिझेल पुरेल एवढाही साठा त्यांच्याजवळ नाही. पाकिस्तानमध्ये आजमितीस पेट्रोल ४६० रुपये



लिटर आणि डिझेल ५०० रुपये लिटर विकले जात आहे. मुजोर पाकिस्तानला वठणीवर आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वच बाबतीत आघाडी घेतली आहे. काँग्रेसने या देशामध्ये आणलेली स्वाभिमानशून्यता पूर्णतः पुसून नरेंद्र मोदी यांनी या देशाची खरी ओळख जगाला करून दिली. त्यामुळे पाकिस्तान आज कितीही फुशारकी मारत असला तरी आतून तो भयभीत झाला आहे. नरेंद्र मोदी यांच्या केवळ नावानेही पाकिस्तानी नेत्यांच्या अंगामध्ये कापरे भरत असले तर त्याचे नवल वाटायला नको. नेमक्या याच भीतीने पाकिस्तानची त्रेधातिरपीट उडाली आहे. नव्या शक्तिशाली भारतापुढे पाकिस्तानने आयुष्यभर पोसलेल्या दहशतवानेही नांग्या टाकल्या आहेत. त्यामुळे पाकिस्तानी नेते ख्वाजा आसिफ सारखी बेताल वक्तव्ये करून संपूर्ण जगामध्ये आपले हसे करून घेत आहेत. पाकिस्तानने जो मार्ग स्वीकारला आहे, त्या मार्गावर भविष्यामध्ये पाकिस्तानचा अंत निश्चित आहे.

मुळात पाकिस्तानचा जन्मच द्वेषापायी झाला आहे. त्यामुळे हा द्वेषाग्नी त्यास भस्म केल्याविना शांत बसणार नाही. खरं तर पाकिस्तान भारताशी कोणत्याही क्षेत्रामध्ये बरोबरी करू शकत नाही. याची जाणीव पाकिस्तानलाही आहे. तरीही पाकिस्तान सुधरत नसेल तर दोष कोणाला द्यायचा. नरेंद्र मोदी २०१४ मध्ये पंतप्रधान झाल्यावर त्यांनी पाकिस्तानला सुधारण्याची अनेकदा संधी दिली. स्वतःहून प्रयत्नही केले. परंतु, पाकिस्तानला ती भाषा कळली नाही. 'लातों के भूत बातों से नहीं मानते' हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओळखल्यावर पाकिस्तान मात्र, मोदी यांना ओळखण्यास कमी पडला. काँग्रसने देशाची फाळणी केली. नेहरूंनी काहीही कारण नसताना काश्मीरचा प्रश्न युनोमध्ये नेऊन तो चिघळत ठेवला. काँग्रेसची अकार्यक्षमता आणि मताच्या राजकारणापायी पाकिस्तानला बळ मिळत गेले. काँग्रेसच्या या धोरणामुळे आपल्या देशामधील लाखो निरपराध नागरिक पाकिस्तानी दहशतवादाला बळी पडले. परंतु, एखाद्या राष्ट्रभक्ताच्या हाती देशाची सत्ता गेल्यावर त्या राष्ट्राचा सन्मान आणि राष्ट्राभिमान कसा जागृत होतो, याचे उदाहरण पंतप्रधान नरेंद्र मोदीमध्ये बघावयास मिळते. अग्नी ५ या मिसाईलमुळे संपूर्ण पाकिस्तान भारताच्या टप्प्यामध्ये आला आहे. सात हजार किमीवर जाऊन अचूक मारा करणारे हे क्षेपणास्त्र पाकिस्तानचे कोणतेही शहर क्षणात उद्‌ध्वस्त करू शकते. नरेंद्र मोदी यांनी तिन्ही दलांचे आधुनिकीकरण करून शस्त्रसज्ज केले आहे. ऑपरेशन सिंदूर भारत सरकारने समाप्त न करतात ते थांबविले आहे. पाकिस्तानने भारताविरुद्ध फक्त एक कृती केली तर ऑपरेशन सिंदूरचा दुसरा भाग त्या देशाचे नामोनिशान मिटविण्याएवढे शक्तिशाली असेल. पाकिस्तानने ही वेळ भारतावर आणू नये, हीच इच्छा आहे.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# उद्योजकतेचा उत्साहवर्धक प्रवास

गेल्या सुमारे दोन दशकांत भारतीय उद्योग-व्यवसायाच्या प्रगतिशील प्रवासात लघुउद्योग क्षेत्रातील स्टार्टअपमधील नव्या व नावीन्यपूर्ण उद्योगांनी आपली विशेष छाप सोडली असून, देश-विदेश स्तरावर त्यांच्या कार्य-कर्तबगारीची नोंद घेण्यात आली आहे. व्यावसायिक संदर्भात या नव्या स्टार्टअप उद्योग व उद्योजकांनी कधी स्वतःचा लघुउद्योग सुरू करायचा, म्हणजे सर्वच संदर्भात मोठी जोखीम समजली जायची. मात्र, या प्रस्थापित विचारधारणेवर आपली कल्पक प्रेरणा व अथक प्रयत्नशीलतेसह या नवउद्योजकांनी यशस्वीपणे मात केली आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

गेल्या २० वर्षांतील या प्रगतिशील परिस्थितीमध्ये बऱ्याच खाचखळग्यांसह विविध टप्पे आढळून येतात. अगदी सुरुवातीला कुणी व विशेषतः युवावस्थेत स्वतःचा नवा व छोटेखानी व्यवसाय सुरू करायचे ठरविल्यास, त्याला प्रेरित-प्रोत्साहित करणाऱ्यांपेक्षा परावृत्त करण्याचेच प्रयत्न होत असत. आज हे चित्र बऱ्याच अंशी बदललेले दिसते. यामागे स्टार्टअपसह लघुउद्योग आणि उद्योजकांनी व्यावसायिक जिद्द, कल्पक क्षमता, कौशल्य व सातत्य यांसह केलेले प्रयत्न महत्त्वाचे ठरले. स्टार्टअप क्षेत्रातील एका पिढीला हे सारे करून स्वतःला सिद्ध करावे लागले. भारतातील लघुउद्योग क्षेत्रातील हे परिवर्तन तसे सहजसाध्य नव्हते. लघुउद्योग क्षेत्रातील अपयशातून शिकून या अपयशी अनुभवानंतर सातत्याने व नव्या उमेदीसह उत्साहाने प्रयत्न करून उल्लेखनीय यश प्राप्त करणाऱ्या लघुउद्योजकांनी आपला आदर्श प्रस्तुत करून ठसा उमटविण्याची उदाहरणे आपल्याकडे दिसून येतात, हे विशेष.

यासंदर्भात 'इन मोबी'चे संस्थापक नवीन तिवारी यांचे उदाहरण नमूद करता येईल. त्यांनी स्टार्टअप स्वरूपात सुरू केलेले चार लघुउद्योग अपयशी ठरले. मात्र, त्यांनी आपल्या जिद्दीसह केलेले प्रयत्न सोडले नाहीत. नवी उमेद व कल्पनांसह प्रयोगशील उद्योजकता केवळ जोपासलीच नाही, तर त्याला प्रयत्नपूर्वक सातत्याची जोड दिली. याचाच परिणाम म्हणजे नवीन तिवारी आज केवळ आघाडीचे व यशस्वी लघु-उद्योजकच ठरले नाहीत, तर त्यांनी मिळविलेल्या यशापोटी आज त्यांच्या व्यवसायाला देशातील पहिला 'युनिकॉर्न' होण्याचा बहुमान मिळाला आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

यासंदर्भात उपलब्ध आकडेवारीनुसार, भारतातील जवळजवळ निम्म्या म्हणजेच ४९ टक्के 'युनिकॉर्न' उद्योजकांना आपल्या यशाचा टप्पा गाठण्यासाठी वारंवार प्रयत्न करावे लागले. यामध्ये आपल्या आधीचे प्रयत्न वा त्याला मिळालेले अपयश यामुळे खचून न जाता, या उद्योजकांनी आपले प्रयत्न सुरू करून यशस्वी 'युनिकॉर्न' होण्याचे आपले यश साध्य केले आहे. यामागे त्यांचे सातत्य व कल्पक प्रयत्न ही महत्त्वाची कारणे ठरली. आधीचे वा सुरुवातीच्या टप्प्यातील अपयश आल्याने खचून न जाता, पुन्हा नव्याने व जिद्दीने प्रयत्न करणाऱ्या यशस्वी स्टार्टअप-'युनिकॉर्न' श्रेणीतील उद्योजकांमध्ये 'फिनटेक स्टार्टअप'पैकी 'फ्रीचार्ज-युनिकॉर्न'च्या कुणाल शाह यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. अशाप्रकारे आधी अपेक्षित यश न मिळविणाऱ्या व नंतर 'युनिकॉर्न' स्तराची झेप घेणाऱ्या यशस्वी लघुउद्योजकांची संख्या सध्या ४०हून अधिक आहे. नव्या स्टार्टअप लघुउद्योजकांना अशाप्रकारे बळ मिळण्यामध्ये आर्थिक पाठबळाची मोठी व महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. स्टार्टअपच्या या प्रगतिशील टप्प्यात आज देशांतर्गत सुमारे पाच लाख स्टार्टअप कार्यरत आहेत. सुरुवातीच्या टप्प्यात म्हणजे २०१६ मध्ये त्यांची संख्या जेमतेम ५०० होती. यातून आजवर साध्य झालेल्या आर्थिक उलाढालीच्या संदर्भात सांगायचे म्हणजे भारतीय स्टार्टअपची २०१६ मध्ये असणारी ५.२ दशलक्ष डॉलर्सची उलाढाल २०२४ मध्ये तब्बल १२.६ दशलक्ष डॉलर्सवर जाणे, ही आर्थिक विश्लेषण कंपनीची माहिती यासंदर्भात उल्लेखनीय आहे. परंपरागत स्वरूपात पाहता, भारतीय लघुउद्योगांचा स्वाभाविक भर व्यावसायिक फायद्यावर असायचा. ही स्वाभाविक परंपरा 'एमएसएमई'सह स्टार्टअपमध्ये पण दिसून येते. याचेच प्रतिबिंब 'सेबी'सारख्या आर्थिक व्यवहार-व्यवसाय क्षेत्रातील नियामक संस्थांच्या धोरणात्मक कारभारात दिसून येते. यातूनच 'सेबी'ने कधी तोट्यात चालणाऱ्या कंपन्यांना सार्वजनिक समभाग विक्री करण्यावर निर्बंध घातले होते.

मात्र, 'सेबी'च्या ध्येय-धोरणांत २०२१ मध्ये महत्त्वपूर्ण व मोठे बदल करण्यात आले. त्यामुळे 'सेबी'द्वारा नवे तंत्रज्ञान व संशोधनासह काम करणाऱ्या कंपन्या फायद्यात नसल्या, तरी त्यांच्याकडे पुरेसे आर्थिक पाठबळ व गुंतवणूक असल्यास अशा कंपन्यांना सार्वजनिक समभाग विकण्याची परवानगी दिली. 'झोमॅटो'च्या सार्वजनिक समभाग विक्रीमुळे या नव्या पुढाकाराला प्रगत दिशा प्राप्त झाली. त्यानंतर या आणि अशा श्रेणीतील सुमारे एक डझनहून अधिक कंपन्यांनी अशाप्रकारे व यशस्वी पद्धतीने समभाग विक्री केली, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

याशिवाय, आर्थिक-व्यावसायिक क्षेत्रातील अद्ययावत स्वरूपात माहिती संकलन-विश्लेषण करणाऱ्या 'क्रेडिबल' या कंपनीने लघुउद्योग-स्टार्टअप क्षेत्रात केलेल्या अभ्यासानुसार, आजवर सुमारे १००हून अधिक स्टार्टअप कंपन्यांनी २०२० ते २०२५ या काळात कंपनीअंतर्गत 'ई-सॉप' पद्धती व त्याद्वारे सुमारे १.७ दशलक्ष डॉलर्सचे व्यवहार यशस्वीपणे केले आहेत. यातील 'ई-सॉप' म्हणजेच, 'एम्प्लॉई स्टॉक ओनरशिप प्लॅन' योजनेद्वारा अशा कंपन्या व कर्मचारी या उभयतांचा लक्षणीय फायदा झाला आहे.

सरकारी योजना आणि पुढाकारामुळे लघुउद्योग-स्टार्टअप क्षेत्राला नव्या दिशेसह मोठे पाठबळ लाभले आहे. विशेषतः नीती आयोगांतर्गत 'अटल इनोव्हेशन मिशन'अंतर्गत मोठ्या प्रमाणावरील कामकाज झालेले आहे. याचाच पुढचा टप्पा म्हणून 'दि यंग एंटरप्रेन्युअर्स अकादमी'च्या माध्यमातून विद्यार्थी-युवकांना उद्योजकतेसाठी प्रेरणा-प्रोत्साहन व मार्गदर्शन देण्याचे मोठे काम होत आहे. परिणामी, आज आठव्या वर्गातील विद्यार्थी रिशान सिंदवानीने उद्योजकतेला प्रोत्साहन देणाऱ्या 'ऑप्टीमाईझ साईट' या स्वतःच्या संकेतस्थळावरून स्वतःचा व वेगळा व्यवसाय विकसित केला आहे, तर बंगळुरू येथे ११व्या वर्गात शिकणाऱ्या आदित्यनने केवळ आपल्या मोबाईल फोनच्या माध्यमातून विविध व्यावसायिक संकल्पनांचा प्रसार-प्रचार करण्याच्या व्यवसायाला फायदेशीर सुरुवात केली आहे. नव्या पिढीतर्फे व नव्या स्वरूपात सुरू झालेला स्टार्टअप उद्योगांचा हा प्रवास नक्कीच उत्साहवर्धक ठरला आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### भोंदूगिरी थांबविण्यासाठी समाज जागृती गरजेची

राज्यातील जनता नाशिकमधील खरातसारख्या बुवा, भोंदूंच्या थापांवर विश्वास ठेवून नादी लागते. त्यामुळेच भोंदूंचे पेव पसरले आहे. यातूनच कोट्यवधीची संपत्ती जमा केली जाते. ही समाजाला लागलेली कीड आहे. स्त्रिया लैंगिक अत्याचाराला भोळ्या मानसिकतेतून बळी पडतात. समाज सुधारकांनी सर्वसामान्य जनतेपर्यंत सत्य काय आणि बनवाबनवी काय आहे हे ओळखण्याची क्षमता निर्माण होण्यासाठी नियोजन पद्धतीने काम केले पाहिजे. विशेषतः स्त्रियांमध्ये जागृती निर्माण केली पाहिजे. केवळ कायदे करून त्याचा उपयोग होत नाही. अशा घटना घडल्यावर केवळ चर्चा करण्यापेक्षा विचारवंत, समाज सुधारक, कायदे पंडित, स्त्रियांच्या कैवारी, अंधश्रद्धा निर्मूलनवादी, राजकीय पक्षांची नेते मंडळींनी समाज जागृतीचे काम केले पाहिजे. समाजाकडून प्रतिसाद न मिळाल्यास अशांचे अनैतिक धंदे बंद होतील.

**ॲड. बळवंत रानडे**/पुणे. ९८८१४७३५८०

### 'पैसा नव्हे प्रेमच महत्त्वाचे!' विचारांना चालना देणारा लेख

पैसा नव्हे प्रेमच महत्त्वाचे! हा आसमंतमधील लेख विचारांना चालना देणारा आहे. आपल्या नवीन विभक्त कुटुंब पद्धतीत ज्येष्ठांचे प्रश्न उपस्थित होत आहेत हे वास्तव आहे आणि ते नाकारूनही चालणार नाही. त्यामुळेच ज्येष्ठांना अपत्यांकडून पालनपोषण भत्ता मिळावा, त्यांनी जर स्वतःचे घर मुलांच्या नावावर केले असेल व त्यांना घराबाहेर काढण्यात आले असेल तर ते घर परत घेण्याचा हक्क न्यायालयाने ज्येष्ठांना दिला आहे. असं सरसकट होत नाही पण काही प्रमाणात होतं हे मान्य करावंच लागेल. राज्यात, देशभरात वाढलेली वृद्धाश्रमांची संख्या ज्येष्ठांना नाकारले जाण्याचे प्रमाण दाखविते. काही दशकांपूर्वी आलेल्या नटसम्राट नाटकातही जेवायचं ताट द्यावं पण डोक्यावरचं छप्पर देऊ नये असे म्हटले होतेच. त्यामुळेच विजयपत सिंघानियांनी त्यांच्या अनुभवावरून काही वक्तव्य केलं असेल तर त्याचा मथितार्थ लक्षात घेणे गरजेचेच आहे. फक्त प्रेमावर जगता येत नाही

## वाचक पत्रे

त्यासाठी आर्थिक बळ लागते व ते प्रत्येकाने वृद्धापकाळासाठी जपणे आवश्यक आहे.

**माया हेमंत भाटकर**/बाणेर पुणे

### विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागृती महत्त्वाची...

विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागृती ही एक आवश्यक गरज आहे. स्वच्छता फक्त शरीराचीच नाही, तर मनाची देखील शुद्धता आहे. स्वच्छतेची सवय विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाल्यास त्यांचे आरोग्य चांगले राहते, रोगराई टाळता येते आणि समाजात सकारात्मक बदल घडतो. त्यामुळे शाळांमध्ये, घरात आणि परिसरात स्वच्छतेबाबत जागृती निर्माण करणे खूप गरजेचे आहे. स्वच्छतेबाबत जागृतीसाठी विद्यार्थ्यांना फक्त शिकवणे पुरेसे नाही, तर त्यांना प्रत्यक्ष कृतीतून स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. स्वच्छतेसाठी नियमित स्वच्छता उपक्रम राबवावेत, स्वच्छता मोहिमा चालवाव्यात, स्वच्छतेचे फळ कसे आरोग्यासाठी उपयुक्त आहे हे विद्यार्थ्यांना समजावून सांगावे. फक्त बोलणे आणि लिहिण्यापेक्षा कृती महत्त्वाची आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वच्छतेची सवय लावणे आणि त्यांना जागरूक करणे हीच खरी गरज आहे. विद्यार्थी हे देशाचे भावी नागरिक असतात. त्यांच्यात योग्य सवयी रुजवणे अत्यंत आवश्यक आहे.

समाजाच्या प्रगतीसाठी आणि निरोगी जीवनासाठी स्वच्छतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून स्वच्छतेच्या सवयी निर्माण झाल्या, तर त्याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण समाजावर होतो. स्वच्छतेच्या सवयी रुजवणे अत्यंत आवश्यक आहे. शाळा हे केवळ शिक्षणाचे केंद्र नसून त्यांनी सवयी घडवण्याचे ठिकाण आहे. स्वच्छता पाळल्यामुळे अनेक आजारांपासून बचाव करता येतो. हात धुणे, स्वच्छ कपडे घालणे, परिसर स्वच्छ ठेवणे यांसारख्या सवयी विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनात असणे गरजेचे आहे. कचरा योग्य ठिकाणी टाकणे अशा सवयी लहानपणापासूनच लावल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागृती केल्यास त्यांचे आरोग्य सुधारते आणि चांगल्या सवयी विकसित होतात. शाळा आणि शिक्षक यांची भूमिका यात अत्यंत महत्त्वाची आहे. यामुळे केवळ वैयक्तिकच नव्हे तर सामाजिक आरोग्यही टिकून राहते. स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व ओळखून ते आपल्या जीवनात अंगीकारले पाहिजे. स्वच्छ विद्यार्थी, स्वच्छ शाळा आणि स्वच्छ समाज हे ध्येय साध्य करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -०८८८८७७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# कृषी अवजारे योजनेला २५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्र कल्पांतर्गत (पोकरा) राबविल्या जाणाऱ्या गावस्तरावरील कृषी अवजारे बँक योजनेसाठी अर्ज करण्यास आता २५ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनेद्वारे ग्रामीण भागातील महिला बचत गटांना आर्थिक सक्षम करण्यासोबतच शेतकऱ्यांना आधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली जाणार आहे.

या योजनेअंतर्गत ग्राम पातळीवर कृषी अवजार बँक स्थापन करण्यासाठी प्रकल्पाच्या एकूण मूल्याच्या ६० टक्क्यांपर्यंत, म्हणजेच कमाल २४ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. उमेद आणि माविम पुरस्कृत महिला बचत गट तसेच महिला गाव संघ या योजनेसाठी पात्र आहेत. प्रत्येक गावातून केवळ एकाच गटाची निवड केली जाईल. एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास ऑनलाइन लॉटरी पद्धतीने लाभार्थी निवडले जातील. इच्छुक गटांनी २५ एप्रिलपर्यंत पोकराच्या अधिकृत पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन आत्माचे प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांनी केले आहे. महिला गटांनी या संधीचा लाभ घेऊन स्वावलंबी व्हावे, असे प्रशासनाने म्हटले आहे.

# बीड जिल्ह्यातील प्रत्येकाच्या मना मनात कमळ निर्माण होई पर्यंत थांबू नका : शंकर देशमुख

## ज्येष्ठांच सन्मान..फटक्यांची आतिषबाजी, ध्वजवंदन जिल्हा कार्यालयात स्थापना दिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**बीड प्रतिनिधी** | ६ एप्रिल भाजपा स्थापना दिवस म्हणून राज्यभर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय जनता पार्टी ने आज देशभरात मजबूत संघटन उभारले असून सामान्य जनतेच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जात आहेत. राष्ट्र प्रथम, नंतर पार्टी, शेवटी स्वतः अंत्योदयाची संकल्पना घेऊन, जनसामान्यांसाठी काम करणाऱ्या भाजपाला आज ४६ वर्ष पूर्ण झाली. आता आपण जिल्ह्यातील प्रत्येकाच्या मनामनात कमळ निर्माण करे पर्यंत थांबायचं नाही असे मत भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

आज ना. मा. पंकजाताई मुंडे, माजी खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, राज्य.का. सदस्य ॲड. सर्जेराव तांदळे, विधानसभा नेते डॉ. योगेश क्षिरसागर, प्रवक्ते मा. रामजी कुलकर्णी यांच्या



उपस्थितीत भाजपा जिल्हा कार्यालय बीड येथे फटाक्यांची आतिषबाजीसह ध्वजवंदन करून पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आ. आदिनाथराव नवले पाटील, मा. पंजाबराव मस्के, मा. विजयकुमार पालसिंगकर, मा. गजानन जगताप यांचा सन्मान करून स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी ॲड वाल्मिक निकाळजे नवनाथ शिराळे, मीराताई गांधले, शिवाजी आप्पा मुंडे, अजय सवाई, शांतिनाथ डोरले, सलीम जहागीर, अनिल चांदणे, सुवर्णाताई लांबरुड, इर्शाद भाई, वाल्मीक अण्णा निकाळजे, अभय वनवे, प्रा. देविदास नागरगोजे, ओमप्रकाश गिरी, संगीताताई धसे, सुनील मिसाळ, बालाजी पवार, डॉ. घुमरे, अशोक रसाळ, अशोक लोढा, नागेश तांबारे, ॲड. गोविंद शिराळे, प्रमोद रामदासी, संग्राम बांगर, जयश्री ताई मुंडे, भाग्यश्रीताई ढाकणे, शितलताई राजपूत, लता राऊत, शैलजाताई मुसळे, संध्याताई मिश्रा, अमोल वडतीले, राजू शहाणे, धनंजय वाघमारे, संभाजी सुर्वे, राजेश सारखा, भालचंद्र कुलकर्णी, अशोक घोडके, नरेश पवार, विठ्ठल ठोकळ, राजेश गवळी, किशोर काकडे, घोलप मामा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# माजलगांवात भाजपा तालुका कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**माजलगांव ( प्रतिनिधी)** | माजलगांव शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक येथे भारतीय जनता पार्टीच्या तालुका कार्यालयाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. नव्या कार्यालयामुळे पक्षाच्या संघटनात्मक कामाला अधिक गती मिळणार असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. हा कार्यक्रम दि. ६ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता आयोजित करण्यात आला होता.

या कार्यालयाचे उद्घाटन भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य अरुण आबा राऊत होते. यावेळी भाजपचे प्रवक्ते राम कुलकर्णी, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब चोले, तसेच भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सचिव तथा नगरसेवक दीपक मेंडके यांची





प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी ज्ञानेश्वर नाना मेंडके, शिवाजी राजवण, नितीन नाईकनवरे, डॉ. अशोक तिडके, दीपक मुंडे, अभय होके, ईश्वर खुरपे, हनुमान कदम, शरद कचरे, प्रदीप जाधवर, कल्याण शेप, सचिन तौर, सिद्धेश्वर राठोड दत्ता महाजन, बाळासाहेब क्षीरसागर, सुभाष साळवे,आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी बोलताना शंकर देशमुख यांनी माजलगाव तालुक्यात भाजपची ताकद वाढत असल्याचे सांगितले. नव्या कार्यालयामुळे कार्यकर्त्यांना एकत्र येऊन अधिक प्रभावीपणे काम करता येईल. तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावेल, असे त्यांनी नमूद केले.


प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा प्रवास उलगडला. जनसंघाच्या स्थापनेपासून ते आजच्या सशक्त भाजपा पर्यंतचा इतिहास त्यांनी स्पष्ट केला.

डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या बलिदानाचा उल्लेख करत कलम ३७० विरोधातील भूमिका, तसेच २०१४ नंतर देशात झालेला बदल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची वाढ यावर त्यांनी प्रकाश टाकला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी, किट्टी आडगाव मंडळ अध्यक्ष रुपाली कचरे तसेच पात्रुड अध्यक्ष डॉ. अभिजित सोळंके यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत जगताप यांनी केले, तर आभार प्रदर्शन रुपाली कचरे यांनी मानले.

# स्वामी विवेकानंद विद्यामंदिर शाळेतील 7 विद्यार्थ्यांची राजर्षी शाहू महाविद्यालय व संत तुकाराम महाविद्यालय स्क्रीनिंग टेस्ट द्वारे निवड





**तभा वृत्तसेवा**

**केज प्रतिनिधी** | जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर [ माध्यमिक विभाग ] या शाळेतील ७ विद्यार्थ्यांची राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर तसेच संत तुकाराम महाविद्यालय लातूर स्क्रीनिंग टेस्ट द्वारे निवड झाली आहे.

यामध्ये- राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर स्क्रीनिंग टेस्टमध्ये- श्रावण रामदास चाटे, आकांक्षा दीपक सांजुरे, प्रज्ञा दिनकर घुले, श्रेयश रघुनाथ बनसोडे या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. तर संत तुकाराम महाविद्यालय लातूर स्क्रीनिंग टेस्टमध्ये- सई बालाजी साखरे, ज्ञानदा सुनील गायकवाड, आयुष जयप्रकाश सातपुते या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

वरील विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, उपाध्यक्ष नईमोद्दीन इनामदार सचिव जी. बी. गदळे, सहसचिव तथा मुख्याध्यापक उपेंद्र कोकीळ, कोषाध्यक्ष फजीलोद्दीन काझी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा शैलाताई इंगळे, स्वयंअर्थ शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नारायणराव अंधारे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, प्राचार्य भैरट सर, प्राथमिक विभागाचे मु. अ. वसंत शितोळे तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले व पुढील

# सोनीमोहा येथील वसंतराव भागवत आश्रम शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## पालक मेळाव्यास्‌ रतिसाद; मान्यवरांची उपस्थिती आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

**तभा वृत्तसेवा**

**किल्ले धारूर (प्रतिनिधी )** | धारूर तालुक्यातील सोनीमोहा येथील *कै. पं. श्यामाप्रसाद मुखर्जी शिक्षण संस्था संचलित, वसंतराव भागवत आश्रम शाळेत* वार्षिक स्नेहसंमेलन आणि पालक मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या या निवासी शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महावितरणचे अभियंता श्री. सुधाकर शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून 'तरुण भारत'चे ज्येष्ठ पत्रकार श्री. सूर्यकांत जगताप, केंद्रप्रमुख श्री. दत्तात्रय घोळवे, शिक्षण विस्तार अधिकारी श्री. शिवाजी अंडील, माजलगावचे गटशिक्षणाधिकारी श्री. हकीम सर, धारूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री. मंगेश तोंडे, सोनीमोहाचे सरपंच श्री. राहुल तोंडे आणि उपसरपंच श्री. संजय तोंडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे



अध्यक्ष श्री. संदीप खिलोजी, सचिव श्री. दीपक डुबे, उपाध्यक्ष श्री. रुपेश चिद्रवार, तसेच श्री. चेतन डुबे, सुमित डुबे आणि सुरज डुबे यांनी विशेष परिश्रम घेतले. व्यासपीठावर गावातील ज्येष्ठ नागरिक श्री. चिंतामण तोंडे, विनायक तोंडे, भाऊसाहेब तोंडे व रमेश चव्हाण यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक संदेश देणारी नाटके, लोकनृत्य आणि गीतांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सविस्तर स्वरूप खालीलप्रमाणे राहिले:

प्रास्ताविकप्रशांत सर यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला.सूत्रसंचालन कापसे सर यांनी आपल्या शैलीत कार्यक्रमाचे संचलन केले.

नियोजन सांस्कृतिक कार्यक्रमाचे नेटके नियोजन मुंडे सर आणि चव्हाण सर यांनी कुलकर्णी सरांच्या मार्गदर्शनाखाली केले.

या मेळाव्यासाठी शाळेचे माजी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. शाळेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारही यावेळी करण्यात आला.

## सौर ऊर्जा प्रकल्पामुळे शेतीसाठी दिवसा वीज उपलब्ध; खा.रजनीताई पाटील

# आनेगाव शिवारात सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**

**केज दि ६(प्रतिनिधी)** | सौर ऊर्जा प्रकल्पामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आधार मिळाला आहे. सौर ऊर्जा ही काळाची गरज आहे. शाश्वत विकासासाठी असे प्रकल्प उभारले पाहिजेत असे मत खा.रजनीताई पाटील यांनी केले त्या आनेगाव शिवारातील केज सोलार प्रायव्हेट लिमिटेड २ मॅगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.



प्रमुख उपस्थिती माजी मंत्री अशोकराव पाटील,माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील,गंगा माऊली साखर कारखान्याचे चेअरमन हनुमंत मोरे, पाटील,युसुफवडगाव पोलीस स्टेशनचे सपोनि मच्छिंद्रनाथ शेंडगे, युसुफवडगाव महावितरणचे सहाय्यक अभियंता श्री हलकुडे,गंगा माऊली उद्योग समूहाचे प्रवीण मोरे,काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, आदित्य ग्रीन एनर्जी लातूरचे जितेंद्र बजाज, ॲड अमित पाटील,तेजस्विनी पाटील,देविका पाटील,रेवती सोनवणे, आदींची हस्ते प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी मांजरा प्रकल्प शाखाधिकारी ए बी गिरी,बी एस ठोंबरे, आनेगावचे चेअरमन रवी इंगळे,शंकरराव इंगळे, माळेगावचे सरपंच कैलास गव्हाणे, बाळासाहेब नांदे अंगदराव हंडीबाग बालाजी इंगळे भारत इंगळे अंकुश हांडीबाग, शिवाजी इंगळे, श्रीराम इंगळे, अंकुश इंगळे, श्रीराम नांदे, गोविंद दोडके, अरविंद मोरे ,प्रवीण खोडसे, जयसिंग राऊत, ज्योतीराम सावंत ,शिवरुद्र चोपणे, दत्ता निकम, पिंटू कोरसाळे, राम इखे ,ज्ञानोबा देवकर, नागनाथ कोरसाळे, नरसिंग सोनवणे, उपसरपंच रवी सोनवणे,प्रशांत आदनाक,आबासाहेब शिंदे, यावेळी बोलताना अशोकराव पाटील म्हणाले सर्वांनी एकत्र येऊन काम केल्यास शेतकरी समृद्ध होईल असे मत व्यक्त केले.

# शताब्दीतही देश- समाजासाठीच, पंचकर्तव्यासाठी मागणं ...भूमी आणि समाज याशिवाय संघाचे दुसरे आराध्य नाही

भारतभूमी आणि भारतीयसमाज, संस्कृती आपले आराध्य ठेवून शंभर वर्षाची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची वाटचाल , याशिवाय दुसरे संघाचे आराध्य नाही, ही वाटचाल सोपी नव्हती, विचार, व्यक्ती आणि पद्धती अशा सर्व विरोधाला सामोरे जावे लागले, ही परीक्षा समजून त्यात उत्तीर्ण होण्यासाठीचाच प्रयत्न संघाने केला. जीभ चावली म्हणून दात पाडायचे का ? संघावर बंदी आणली, खोटे आरोप लावले . संघाबद्दल गैरसमज करून घेणे खूप सोपे पण संघ समजून घेणे तितकेच अवघड तरीही संघाला समर्थनही तेवढेच मिळाले ,या समाजरूपी ईश्वरासमोर नतमस्तक होण्याचा, कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा शताब्दी वर्षानिमित्त एक कार्यक्रम .


शिक्षण, आरोग्य, सन्मान, रोजगार यातील अभाव दूर करण्यासाठीचा प्रयत्न म्हणजे ८० हजार सेवा कार्य देशभरात संघाचे सुरू आहेत. मानवनिर्मित असो की निसर्गनिर्मित, संकट काळात मदतीला संघ जातो, तो याच भावनेतून की आम्ही आईची-मातृभूमीची सेवा करत आहोत, ती काही चौकात जाऊन सांगण्यासाठी नाही, ती कर्तव्य भावनेतून करत असतो.

आणीबाणी विरोधात आणि राममंदिर निर्माण कार्यात संघाचे सामूहिक आंदोलने होती. प्रत्येक आईला आपला मुलगा जसा गुणवान, आदर्श असावा असे वाटते तसा समाजातील प्रत्येक हिंदू गुणवंत ,कौशल्यपूर्ण ,मूल्यांनी युक्त असा असावा असे "व्यक्ती निर्माणा"चे संघ कार्य करतो आहे ,त्यासाठी एक लाख गावातून संघ शाखा सुरू आहेत, या शिवाय संघाचे दुसरे कोणतेही कार्य नाही, जर कोणी म्हणत असेल तर ते संघ नावावर खपवले जात आहे असं ही स्पष्ट करत 'आराध्य केवळ भूमी आणि समाज आहे' असे श्री रवीजी किरकोळे यांनी बीड येथील समाजातील महत्त्वाच्या आणि प्रभावी व्यक्तीशी संवाद साधताना व्यक्त केला.

प्रमुख नागरिक संगोष्टी ,एक विशेष विचार मंथन कार्यक्रमाचे आयोजन बीड येथील हॉटेल नीलकमलच्या सभागृहात रविवार ५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले होते. संघ शताब्दी निमित्ताने विचार मंथनाला नवी ऊर्जा देत समाज हितासाठी च्या प्रयत्नांना अधिक बळकटी देण्याच्या उद्देशाने या एकत्र भेटीतून समाजासाठीच आशीर्वाद रुपी पंचकर्तव्यासाठी चे मागणं ही उपस्थितां समोर किरकोळे यांनी ठेवले.

एकत्र कुटुंब ,आदर्श कुटुंब हे समाजाचे मोठे शक्ती स्थान आहे. कुटुंबात संवाद असावा, कुटुंब शक्तीमुळे भरभराटी होते , कुटुंबासाठी वेळ दिला पाहिजे .

केवळ स्वदेशी वस्तूंचा आग्रह नव्हे तर तसा स्वभाव प्रत्येकाने पोशाख ,खाद्य ,मूल्य दैनंदिन सर्वात याची जाणीव




ठेवली जावी. पर्यावरणाचे रक्षण होईल, पाण्याचा योग्य वापर ,प्लास्टिकचा गैरवापर ,वृक्षतोड, फॅशन वेस्ट यापासून दूर राहणारा स्वभाव बणावा.

परदेशातील नियम, तेथील स्वच्छता याचे कौतुक आपल्या देशात आल्यावर होते पण इथे घरी आपण ते पाळतो का? नियम, बंधनं पाळली गेली पाहिजेत ती सामाजिक अथवा सरकारी असो, सर्व क्षेत्रात देश पुढे जातो आहे, तेव्हा अनुशासन, नागरी नियम पाळले गेलेच पाहिजेत.

आज सर्वात मोठे आव्हान जातीयतेचे ठरत आहे ,हा प्रश्न सुटला की समाजात प्रश्नच राहणार नाहीत ,यासाठी यापूर्वी सर्व महापुरुषांनी अनेक कालावधीपासून प्रयत्न केलेले आहेतच त्यांना आपण पराभूत केले असे वाटू लागले आहे .संधी प्रतिष्ठा, न्याय, सुरक्षा सर्वांना मिळायला हवी असे पंच परिवर्तनासाठीचा आशीर्वाद संघासाठी नव्हे तर समाजाकडून समाजासाठीच मागतो आहे, असे शताब्दी वर्ष साजरे करत समाजाची कृतज्ञता आणि आशीर्वाद रुपी मागणं असा हा कार्यक्रम आयोजित केला गेला होता.

संघात कर्मकांडाला महत्व नाही, तो ज्याच्या त्याच्या व्यक्तिगत विषय असतो. संघ संविधान मानतो, पालन करतो, त्याप्रमाणेच वागतो. संघ कोणाच्या विरोधासाठी म्हणून स्थापन झालेला नाही. राष्ट्रप्रेम , भूमी आणि येथील संस्कृती या कार्य यात जो दूर असेल त्याला संघ दूर ठेवतो. खरं म्हणजे जन्मजात राष्ट्रप्रेम असले पाहिजे, ते उत्पन्न करावे लागते, त्यासाठी बाल मनापासुन संघ घडविण्याचे काम करतो .

युवाशक्ती ही मोठी शक्ती असते ,ती समजून घेत त्यांच्या भाषेत बोलता आलं पाहिजे तर शक्ती समजेल,समाजाचा आत्मविश्वास जागृत करणे हेच संघाचे काम.

सर्वच दुर्गुणांचे पुतळे आहेत हा समज खोटा आहे, समाजात सज्जनशक्ती मोठी आहे, ती समोर आली पाहिजे, ते बोललं गेलं पाहिजे.

न्यायव्यवस्थेत सुधारणा, कालबाह्य कायदे गेले पाहिजेत. येथील विविध दीर्घ सांस्कृतिक परंपरावर आघात न होऊ देता समान नागरी कायदा ही व्हावा .आरक्षणाची गरज आहे तोपर्यंत ते असावे .मूल्य, धारणा, सर्वार्थाने जेव्हा हिंदू खंबीर असेल तर संघर्ष करण्याची गरज राहणार नाही. हिंदू असणं आणि दिसणं हे महत्त्वाचे आहे. संस्कार आणि संस्कृती संवर्धनासाठी संघ कार्य करत आहे. व्यसनाधीनता, धर्मांतर, कुटुंब प्रबोधन, श्रमाला प्रतिष्ठा या विषयात समाजातील सज्जनशक्तीला यापुढे साथसंगत करत संघ कार्य राहणार आहे, असे अखिल भारतीय समरसता गतीविधीचे सहसंयोजक श्री रवीजी किरकोळे यांनी जिज्ञासा, प्रश्नांच्या उत्तरा दाखल समाधान ठेवण्याच्या दृष्टीने सांगितले.या वेळी, डॉ अनिलजी बारकुल, डॉ.संतोष सानप यांच्या सह सभागृहात मोठी उपस्थिती होती.

काटेकोर वेळापत्रक, नियोजन , सर्व व्यवस्था, स्वागत, स्पष्ट विचार मंथन, व्यापक दृष्टिकोन याविषयी मार्गदर्शन याचे समाधान उपस्थितांना मिळाल्याचा भाव ठेवत प्रत्येकाने स्नेह जपला हे या संगोष्टी चे फलीतच....

शब्दांकन - प्रमोद
(९४०३९०४६५१)

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ट्रेडिंगच्या आमिषाने ६३.५० लाखांची ऑनलाईन फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ एप्रिल -**

ट्रेडिंगमध्ये जास्त परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका व्यक्तीची तब्बल ६३ लाख ५० हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुशिलकुमार शिवाजीराव सर्डे (वय ४५, रा. समर्थ नगर, धाराशिव) यांना दि.२० जानेवारी २०२६ ते दि.९ मार्च २०२६ दरम्यान अनोळखी इसमाने मोबाईलवर लिंक पाठवून तसेच व्हॉट्सअॅपवर चॅटिंग करून ट्रेडिंगमध्ये मोठा फायदा होईल, असे सांगितले. अधिक परतावा मिळण्याचे आमिष दाखवत आरोपीने त्यांना गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. या आमिषाला बळी पडत फिर्यादी यांनी विविध टप्प्यांत एकूण ६३,५०,००० रुपये गुंतवले. मात्र, अपेक्षित परतावा न मिळाल्याने त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दि.६ एप्रिल ६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास सायबर पोलिसांकडून सुरू आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### परंड्यात भाजपा स्थापना दिन साजरा

**परंडा, दि.७ एप्रिल -**

६ एप्रिल १९८० रोजी स्थापन झालेल्या भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त परंडा येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. राष्ट्र प्रथम या ध्येयाने कार्य करणाऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उत्साहात स्थापना दिन साजरा केला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील भाजपा संपर्क कार्यालयात भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते भारतमाता, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाळ उपाध्याय आणि अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमांचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, गणेश खरसडे, उमाकांत गोरे, समरजीतसिंह ठाकूर, अविनाश विधाते, सुबोधसिंह ठाकूर, अॅड. जहीर चौधरी, विकास कुलकर्णी, डॉ. अमोल गोफणे, साहेबराव पाडुळे, बाबासाहेब जाधव, किरण देशमुख, शिवाजी पाटील, निशिकांत क्षिरसागर, बाळासाहेब गिरी, मनोहर मिस्कीन, तानाजी घोडके, अजिम हन्नुरे, गौरव पाटील, मनोहर पवार, सिद्दीक हन्नुरे, सुरज काळे, जोती भातलवंडे, गायत्री तिवारी तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शेतकऱ्याचा मुलगा संदीप बचाटे पोलिस दलात भरती

**मंगरूळ, दि.७ एप्रिल -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील रहिवाशी शेतकरी दिलीप बचाटे यांचा मुलगा संदीप बचाटे हा



पोलिस दलात भरती झाला असून जिद्द, चिकाटी, परिश्रम व सातत्याच्या जोरावर त्याने हे यश संपादन केले आहे. संदीपकडे पोलिस भरती होण्यासाठी कुठल्याही भौतिक गोष्टी उपलब्ध नसतानाही प्रचंड मेहनतीच्या जोरावर त्याने कुठल्याही गोष्टीचे अवडंबर न करता पोलिस भरतीसाठी लागणारी शिस्त व कौशल्य हस्तगत केले बऱ्याच वेळा अपयश आले. परंतु खचून न जाता त्याने सातत्याने सराव करून हे यश संपादन केले. त्याच्या या यशाबद्दल मंगरुळ व परिसरातून अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

### विद्यार्थ्यांची बँकेला शैक्षणिक भेट

**भूम, दि.७ एप्रिल -**

शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम येथील बी.कॉम द्वितीय वर्ष तसेच अर्थशास्त्र विभागातील बी.ए. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी दि.२ एप्रिल रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया, भूम येथे शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रातील व्यवहारांची प्रत्यक्ष माहिती मिळावी हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना बँकेतील विविध विभागांची माहिती देण्यात आली. तसेच सिनिअर मॅनेजर राहुल गाढे व बँक व्यवस्थापक अशोक चव्हाण यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य अनुराधा जगदाळे, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. पूनम सुतार, प्रा. सौरभ जगदाळे, डॉ. रूपाली मोरे तसेच इतर प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# बेरडवाडीत दुहेरी हत्याकांड; पत्नी व ८ वर्षीय मुलीचा कुऱ्हाडीने खून

### हादरवणारी घटना : आरोपी पती पोलिसांत हजर

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम/उमरगा, दि.७ एप्रिल -**

उमरगा तालुक्यातील बेरडवाडी येथे एका व्यक्तीने आपल्या पत्नीची आणि अवघ्या आठ वर्षांच्या चिमकलीची कुऱ्हाडीने वार करून अत्यंत निघृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या दुहेरी हत्याकांडाने संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली असून, आरोपी पतीने स्वतः मंगळवारी पहाटे मुरूम पोलीस ठाण्यात हजर होऊन आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे.

लिंबाबाई अजित वासुदेव आणि मानसी (वय ८ वर्षे) अशी या घटनेतील मृत माय-लेकीची नावे आहेत.

तर, अजित अणप्पा वासुदेव असे खून करणाऱ्या आरोपी पतीचे नाव आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आरोपी अजित वासुदेव हा मंगळवारी पहाटे २ वाजेच्या सुमारास स्वतःहून मुरूम पोलीस ठाण्यात पोहोचला. तिथे त्याने पोलिसांसमोर आपल्या पत्नीचा आणि मुलीचा कुऱ्हाडीने खून केल्याची धक्कादायक कबुली दिली. आरोपीने गुन्ह्याची कबुली देताच मुरूम पोलिसांनी तातडीने बेरडवाडी येथील घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी शेलार, मुरूम पोलीस ठाण्याचे अधिकारी संदीप दहिफळे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांचे पथक दाखल झाले. पोलिसांनी



घटनास्थळाचा रीतसर पंचनामा केला. दोन्ही मृतदेह ताब्यात घेऊन मुरूम येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी (शवविच्छेदन) पाठवण्यात आले आहेत.

स्वतःच्याच पत्नी आणि निष्पाप मुलीची इतक्या निघृणपणे हत्या करण्यामागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

दरम्यान, या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन दुपारी पोलीस अधीक्षक रितू खोकर यांनी मुरूम पोलीस ठाण्यात धाव घेतली असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास करण्यात येत आहे.

## दारुच्या नशेत मुलाकडून वडील व भावावर लोखंडी रॉडने हल्ला

### दोघे गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.७ एप्रिल -**

दारूच्या नशेत झालेल्या कौटुंबिक वादातून स्वतःच्या वडिलांवर आणि सख्ख्या भावावर लोखंडी रॉडने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना भूम तालुक्यातील ईट येथे घडली. या घटनेत दोघेही गंभीर जखमी झाले असून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विजय अंगद वेदपाठक (वय ३१, रा. ईट, ता. भूम, जि. धाराशिव) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. शनिवार (दि. ४ एप्रिल) रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास त्यांचा भाऊ अक्षय अंगद वेदपाठक हा दारू पिऊन घरी आला. नशेत असताना त्याने विजय व त्यांच्या वडिलांना विनाकारण शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

वाद वाढत गेल्याने संतापाच्या



भरात अक्षय याने लाथाबुक्क्यांनी तसेच जवळील लोखंडी रॉडने वडील व भावावर हल्ला केला. या मारहाणीत दोघेही गंभीर जखमी झाले. एवढ्यावरच न थांबता त्याने जीवे मारण्याची धमकीही दिली.

घटनेनंतर जखमी विजय वेदपाठक यांनी वाशी पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवली. त्यांच्या फिर्यादीवरून आरोपी अक्षय वेदपाठक याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस ठाणे अंमलदार शिशिकांत खोत करीत आहेत.


## नळदुर्गमध्ये गोलाई चौक ते संविधान चौक मार्ग उजळणार; बंद पथदिवे लवकरच सुरु

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ एप्रिल -**

आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातून व नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या पाठपुराव्यामुळे नळदुर्ग शहरातील गोलाई चौक ते बसस्थानकासमोरील संविधान चौकापर्यंतचे बंद पडलेले पथदिवे लवकरच सुरू होणार आहेत. सध्या या मार्गावर नवीन केबल टाकण्याचे काम सुरू आहे.

नळदुर्ग शहरातील या राष्ट्रीय महामार्गावरील ४८ पोलवरील पथदिवे गेल्या अनेक महिन्यांपासून बंद होते. उभारल्यानंतर काही दिवस वगळता हे दिवे कायम बंदच राहत असल्याने रात्रीच्या वेळी गोलाई चौक ते संविधान चौक परिसर अंधारात बुडत होता. त्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते, तसेच अपघातांचा धोका देखील वाढला होता.

याबाबत अनेकदा मागणी करूनही संबंधित विभागाकडून



दखल घेतली जात नव्हती. माजी नगरसेवक सुधीर हजारे यांनीही वारंवार पाठपुरावा केला होता. अखेर आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या पुढाकारामुळे आणि नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हे काम मार्गी लागले आहे.

सध्या सुरू असलेले केबल टाकण्याचे काम पूर्ण होताच पथदिवे तत्काळ सुरू करण्यात येणार आहेत. ४८ पोलवरील ९६ दिवे सुरू झाल्यानंतर संपूर्ण महामार्ग विजेच्या प्रकाशाने उजळून निघणार असून, अंधाराचे साम्राज्य दूर होईल.

तसेच नळदुर्ग शहराच्या सौंदर्यातही मोठी भर पडणार आहे.

## उमरगा उपजिल्हा रुग्णालयात सिटी स्कॅन सेंटर सुरू

### आ. प्रविण स्वामींच्या प्रयत्नांना यश... रुग्णांना मोठा दिलासा...



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.७ एप्रिल -**

येथील उपजिल्हा रुग्णालयात नव्याने सुरू करण्यात आलेल्या सिटी स्कॅन सेंटरचे उद्घाटन आ. प्रवीण स्वामी व बळीराजा पाणंद रस्ते सह-अध्यक्ष तथा भाजप नेते शरण पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. या अत्याधुनिक सुविधेमुळे परिसरातील गोरगरीब रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून उपचारासाठी बाहेरगावी जाण्याची गरज कमी होणार आहे.

रुग्णालयातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने आमदार प्रवीण स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत रुग्णालयातील विविध समस्या, रिक्त पदे, स्टाफची कमतरता तसेच रुग्णांच्या अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

बैठकीत अतिदक्षता विभाग (आयसीयु) हा प्रमुख मुद्दा ठरला. तांत्रिक कारणांमुळे हा विभाग अद्याप पूर्ण क्षमतेने सुरू होऊ शकलेला नाही. यासाठी प्रशिक्षित स्टाफ व किमान दोन तज्ज्ञ फिजिशियन डॉक्टरांची गरज असल्याचे आमदारांनी सांगितले. या पदांच्या भरतीसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करून लवकरात लवकर आयसीयू कार्यान्वित करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी युवा नेते अजिंक्य पाटील, पंचायत समिती सदस्य हरी जाधव, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी फुलारी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. कोमल जाधव, डॉ. कपिल महाजन, डॉ. आशा कदम, इंडियन मेडिकल असोसिएशन उमरगा शाखेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत मोरे, सचिव डॉ. विजय बेडदुर्गे तसेच डॉ. दत्तात्रय थिटे, डॉ. विनोद जाधव, डॉ. विजय जाधव, डॉ. राजेश सोनवणे, डॉ. सुनंदा सूर्यवंशी (जाधव), डॉ. सुप्रिया टिके, डॉ. पंडित बुटुकणे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

समारोपप्रसंगी आमदारांनी रुग्णालयातील स्वच्छता व औषध उपलब्धतेबाबत समाधान व्यक्त करत आवश्यक सूचना दिल्या. शासनाच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या आरोग्य सुविधांचा लाभ तळागाळातील प्रत्येक रुग्णापर्यंत पोहोचावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.


उमरगा उपजिल्हा रुग्णालयावर कर्नाटक व शेजारील भागातून मोठ्या प्रमाणावर रुग्ण येत असल्याने येथे अधिक सुविधा उपलब्ध करून देण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. त्यामुळे नागरिकांना उपचारासाठी बाहेरगावी जाण्याची वेळ येऊ नये, यावर भर देण्यात आला.

## खसखस लागवडीस परवानगी देण्याची शेतकऱ्याची शासनाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.७ एप्रिल -**

राज्यातील वाढता शेती खर्च, घटते उत्पादन आणि बाजारातील अस्थिर भाव यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना पर्यायी उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध करून देण्याची गरज निर्माण झाली असून, मस्सा (खं) (ता. कळंब जि. धाराशिव) येथील शेतकरी कार्यकर्ते बब्रुवान नरसिंग गोरे यांनी राज्य शासनाकडे खसखस लागवडीस परवानगी देण्याची मागणी केली आहे.

दि.२ एप्रिल रोजी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांना दिलेल्या निवेदनात गोरे यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या शेतात किमान एक हेक्टर क्षेत्रावर खसखस पिकाची कायदेशीर लागवड



करण्यास परवानगी द्यावी, तसेच या पिकाचे उत्पादन शासनाने खरेदी करून शेतकऱ्यांना आर्थिक आधार द्यावा, अशी विनंती केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सध्याची शेती पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असून दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट यांसारख्या संकटांमुळे मोठे नुकसान होत आहे. उत्पादन घटत असून खर्च वाढत असल्याने शेती तोट्यात जात आहे. त्यातच बाजारभावातील चढ-उतारामुळे शेतकऱ्यांची स्थिती अधिकच बिकट होत आहे.

या परिस्थितीत शेतकरी कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले असून मुलांच्या शिक्षणाचा खर्चही परवडत नाही. अनेक शेतकरी मानसिक तणावाखाली जाऊन टोकाचे निर्णय घेत असल्याची खंतही गोरे यांनी व्यक्त केली आहे.

खसखस लागवडीस कायदेशीर परवानगी देऊन शासनाने योग्य धोरण आखल्यास शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळेल व आत्महत्यांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या मागणीवर शासनाने लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

## जयंती उत्सव समितिच्या अध्यक्षपदी गायकवाड

**लोहारा, दि.७ एप्रिल -**

लोहारा तालुक्यातील माकणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी रोहीत गायकवाड तर उपाध्यक्षपदी स्वप्निल जाधव सचिवपदी आकाश कांबळे सहसचिवपदी अनिरुद्ध जाधव, कोषाध्यक्षपदी किशोर गायकवाड, संघटक सुजित माकणीकर, मिरवणूक प्रमुख विकास कांबळे, सागर जाधव, सुमित जाधव, आयुष जाधव, पियुष जाधव, प्रमोद कांबळे, किशोर गायकवाड निवड करण्यात आली. अविनाश कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली असून यावेळी जयंती उत्सव समितिच्या निवडी बिनविरोध करण्यात आल्या.

## छत फोडून बियरशॉपीत चोरी; २ लाखांहून अधिक माल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.७ एप्रिल -**

उमरगा बायपास रोडवरील फ्रेन्डस बियरशॉपी दुकानात छत फोडून अज्ञात चोरट्यांनी मोठी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे.

कैलास कांबळे (रा. मुळज) यांच्या दुकानात दि. १९ मार्च रात्री ते २० मार्च सकाळदरम्यान चोरट्यांनी छतावरील पत्रा कापून आत प्रवेश केला. त्यांनी दुकानातील २ लाख रुपये रोख रक्कम तसेच इतर साहित्य असा एकूण २ लाख ६ हजार ५०० रुपयांचा माल लंपास केला.

याप्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## यात्रेनिमित्त भाविकांना फळांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.७ एप्रिल -**

येथील प्रसिद्ध श्री येडेश्वरी देवीचा चैत्र पौर्णिमा महोत्सव उत्साहात साजरा होत असून विविध धार्मिक कार्यक्रमांना भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. यात्रेनिमित्त ग्राहक समिती, जि. धाराशिव यांच्या वतीने भाविकांची सेवा आणि देवीवरील श्रद्धा या भावनेतून फळांचे वाटप करण्यात आले.

यात्रेदरम्यान आलेल्या भक्तांना केळीचे वितरण करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमामुळे भाविकांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे कौतुक केले. भविष्यातही अशाच प्रकारचे अधिक सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती ग्राहक समितीचे प्रदेशाध्यक्ष तानाजीराव गुंड यांनी दिली. यावेळी तानाजीराव गुंड, गणेश बारकूल (युवक जिल्हाध्यक्ष), सतीश बुरगुटे (प्रदेश कार्याध्यक्ष), शिवाजी दांगट (जिल्हाध्यक्ष), विष्णू पवार (ता. अध्यक्ष, बार्शी), किरण गुंड यांच्या हस्ते फळांचे वाटप करण्यात आले.

तसेच सुहास बारकूल, महादेव बारकूल, वैभव बारकूल, राजेंद्र यादव, विनोद यादव, गणेश पवार, भिकाजी थिटे, प्रितेश बारकूल, परशुराम बारकूल आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# 'मार्च एंड'च्या नावाखाली सावकारांचा तगादा!

### अव्वाच्या सव्वा व्याजाने गरजवंत हैराण...

**महावीर जालन**
**भूम, दि.७ एप्रिल -**

बँका, पतसंस्था आणि सेवा संस्थांचा 'मार्च एंड' संपल्यानंतर आता खाजगी सावकारांनीही 'मार्च एंड'चा फंडा वापरून वसुलीचा सपाटा लावल्याचे चित्र भूम तालुक्यात दिसत आहे. दहा हजार रुपयांवर आठवड्याला तब्बल एक हजार रुपये व्याज आकारत गरजवंतांना आर्थिक जाळ्यात अडकवले जात आहे.



भूम तालुक्यातील डोकेवाडी, गिरवली, सोननेवाडी, अंजनसोंडा, पखरूड, लांजेश्वर, घाटनांदूर, ज्योतिबाचीवाडी आदी परिसरात खाजगी मध्यस्थांच्या मदतीने सावकारांचे मोठे जाळे कार्यरत असल्याची चर्चा आहे. फोनवरून तगादा, दमदाटी, शिवीगाळ, मारहाण अशा प्रकारांनी वसुली केली जात असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

अतिवृष्टीमुळे आधीच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना आणि गरजूंना या सावकारी पाशाने अधिकच हैराण केले आहे. लग्नकार्य, घरबांधणी, व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जाच्या हप्त्यांमुळे अनेक जण सावकारांकडे वळत आहेत. कोणतीही कागदपत्रे किंवा धनादेश न घेता मध्यस्थांमार्फत कर्ज देण्याचा हा व्यवसाय बिनधास्तपणे सुरू आहे.

> भूम तालुक्यात बेकायदेशीर सावकारी करणाऱ्यांवर दुय्यम निबंधक कार्यालय लक्ष ठेवून आहे. माहिती मिळताच संबंधितांवर छापे टाकून कठोर कारवाई केली जाईल. नागरिकांनी अशा सावकारांविषयी गुप्त माहिती द्यावी, त्यांचे नाव गोपनीय ठेवले जाईल.
> **- शंकर शिंदे, पोलीस निरीक्षक, वाशी**

'मार्च एंड'च्या नावाखाली सावकारांकडून थकबाकीदारांकडील मोबाईल, मोटारसायकल, टीव्ही, फ्रीज अशा घरगुती वस्तू जप्त केल्या जात आहेत. काही ठिकाणी कर्जदारांकडून शेतातील व घरातील कामेही व्याजाच्या मोबदल्यात करून घेतली जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. या अवैध सावकारीला कंटाळून काहींनी आत्महत्याही केल्याची माहिती स्थानिकांकडून दिली जात आहे.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# लोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे रुपडं बदलणार ; ४० लक्ष रुपयांचा खर्च

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ७ एप्रिल -**

लोहा नगर पालिकेत सत्तांतर झाल्या नंतर शहराच्या विकासात भर पडते आहे. जुन्या शहरात जाणार मस्जिद ते पूल असा प्रशस्त सिमेंट रस्ता झाला आहे ते विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आ प्रतापराव पाटील चिखलीकर याचा ड्रीम प्रोजेक्ट पैकी एक असलेले भव्य असे बुद्ध विहाराचे काम अंतिम टप्प्यात असून स्वामी समर्थ मंदिर परिसरात एक कोटीचे नमो उद्यान साकारत आहे.शहरात प्रवेश करताना छत्रपती शिवाजी महाराज मुख्य चौक अतिशय आकर्षक व प्रशस्त होत असून तेथे भगवा ध्वज उभारण्यात येणार आहे .काम पूर्णत्वास गेल्या नंतर शहराच्या वैभवात भर पडणार हा चौक होणार आहे

लोहा शहरात सत्तांतर झाल्या नंतर नगराध्यक्ष शरद पवार उपनगराध्यक्ष करिम शेख व टीम याची स्वच्छ सुंदर शहर हा उपक्रम हाती घेतला .आ प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नगर पालिकेत पार पडलेल्या अधिकाऱ्यांच्या पहिल्याच बैठकीत लोहा शहरात दुकानाच्या समोर बॅनर लावू नये अशी सक्त ताकीद दिली

शिवजयंती निमित्ताने नगराध्यक्ष शरद पवार व टीमने शिवप्रेमींना आवाहन केले तसेच बॅनर ऐवजी पुस्तके द्या हा उपक्रम राबविला त्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त बॅनर लावताना नगर पालिकेने नेमून दिलेल्या जागेवर बॅनर लावावे सामाजिक व विधायक उपक्रम राबवावेत असे आवाहन नगराध्यक्ष शरद पवार व टीमच्या



वतीने करण्यात आले आहे

जुना लोहा शहरात जाणार प्रशस्त रस्ता झाला आहे .लवकरच सार्वजनिक शौचालय उभारण्याचे काम पूर्णत्वास जाईल .आ प्रतापराव पाटील यांनी नेहमीच शहराच्या विकासासाठी निधी दिला आहे युवा नेते प्रावी। पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष शरद पाटील व टीम।चागले काम करीत आहे

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकारण अंतिम टप्प्यात आहे तर जगतज्योति महात्मा बसवेश्वर याचा पुतळयाचे सुशोभिकरणं करण्यासाठी दीड कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावी असे पत्र आ चिखलीकर यांनी मुख्यमंत्र्यांना दिले आहे .

शहरातील मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या समोर भव्य असा चौक आहे .या चौकाचे सुशोभिकारण ४० लक्ष रुपये खर्चून केले जात आहे हे काम पूर्ण झाल्या नंतर शहराच्या वैभवात भर टाकणारा सुंदर आकर्षक चौक उभा राहील शिवाय दिव्यांच्या उजेडाने हा परिसर न्हाळून निघणार आहे

## विविध वृत्त...

### आ. कोहळीकर यांनी गुड्डा परिवाराचे केले सांत्वन

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ७ एप्रिल -**

हदगाव येथील शिक्षक गणेश गुड्डा यांचा बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे काही हल्लेखोरांनी केलेल्या मारहाणीत त्यांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबात एक लहान मुलगा ,एक मुलगी आई व पत्नी असे कुटुंब असून त्या कुटुंबावर झालेल्या दुःखात सहभागी होण्यासाठी व त्यांच्यावर केलेल्या हल्ला हा नियोजित असून त्या हल्ल्याचा निषेध करत तो हल्ला केलेल्या गुन्हेगाराच्या मुळाशी जाण्याचे व त्यातील कोणताही गुन्हेगार सुटता कामा नये त्यासाठी त्यांनी बुलढाणा येथील पोलीस अधीक्षक यांच्याशी भ्रमणध्वनी वरून चर्चा करून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषीवर गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी

### 'मंगल मिशन' राष्ट्रीय स्पर्धेत कु. सायली जमदाडेची उत्तुंग भरारी; एमआयटी कॉलेजच्या संघाची निवड

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ७ एप्रिल -**

तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या कतृत्वाच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर नाव उज्वल करण्याची परंपरा कायम ठेवत . उमरी येथील मूळ रहिवासी असलेली आणि



सध्या छत्रपती संभाजीनगर येथील एमआयटी (चखढ) महाविद्यालयात शिक्षण घेणारी विद्यार्थिनी कु.सायली साईनाथ जमदाडे हिने इस्रोच्या (खडठज) मंगल मिशनवर आधारित राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत विशेष यश संपादन केले आहे.

२४० संघांमधून एमआयटीच्या संघाची निवड

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (खडठज) मंगल मिशनवर आधारित या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत संपूर्ण भारतातून एकूण २४० संघांनी सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या पहिल्या फेरीत सायली जमदाडे समावेश असलेल्या एमआयटी कॉलेजच्या संघाची निवड करण्यात आली आहे. या यशामुळे सायलीचे सर्वत्र कौतुक होत आहे. विशेष म्हणजे कु.

सायली साईनाथ जमदाडे हिचे नर्सरी पूर्व प्राथमिक वर्गापासून ते बारावीपर्यंतचे शिक्षण शालेय शिक्षणाचा भक्कम पाया असलेल्या उमरी येथील गिरीष देशमुख इंग्लिश स्कूल व विद्याभारती ज्युनिअर कॉलेज येथे पूर्ण झालेले आहे. ग्रामीण भागातील शाळेत शिक्षण घेऊनही तिने मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

दिग्गजांकडून अभिनंदनाचा वर्षाव

कु.सायलीच्या या यशाबद्दल गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. विक्रमजी देशमुख, मुख्याध्यापिका स्वाती वचेवार , प्राचार्य विश्वजीत विक्रमजी देशमुख तसेच मोगल आवेज बेग व इंग्लिश स्कूलमधील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले आहे. सायलीच्या या कामगिरीमुळे उमरी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, तिच्या भावी वाटचालीस संस्थेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

### गोदावरी नदी पुनरुज्जीवनासाठी नांदेड जिल्हा प्रशासनासोबत सामंजस्य करार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ एप्रिल -**

जिल्हा प्रशासनासोबत गोदावरी नदी खोऱ्याच्या पुनरुज्जीवनासाठी सामूहिक उपक्रम राबवण्यासाठी सामंजस्य करार डियाजियो इंडिया यांनी केला आहे.हा करार आज नांदेडचे जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले आणि डियाजियो इंडिया येथील मॅच्युरेशन अँड डिस्टिलेशन (नांदेड) चे महाव्यवस्थापक प्रकाश वामनराव बोडाडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या उपक्रमामुळे प्रदेशात शाश्वत जलसंपदा व्यवस्थापन आणि पर्यावरणीय पुनर्स्थापनेसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.या भागीदारीद्वारे डियाजियो इंडिया जिल्हा प्रशासनाला पाणी पुनर्भरण आणि वॉश (पाणी, स्वच्छता आणि स्वच्छतेच्या सवयी) संबंधित उपक्रम राबवण्यासाठी सहकार्य करणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालय प्राधान्यक्रमाने जलस्रोतांची निवड करणे आणि संबंधित शासकीय योजनांशी समन्वय साधून जास्तीत जास्त परिणाम साधणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल. नांदेडचे जिल्हाधिकारी श्री.राहुल कर्डिले म्हणाले,गोदावरी नदीचे पुनरुज्जीवन हे आमच्या प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण ते लोकांच्या उपजीविका,शेती आणि पर्यावरणीय संतुलनाशी निगडित आहे. डियाजियो इंडिया सोबतचे हे सहकार्य सामूहिक प्रयत्नांची ताकद दर्शवते. पाणी पुनर्भरण उपक्रमांमुळे भूजल पातळी सुधारण्यास मदत होईल आणि शेतकऱ्यांना अधिक विश्वासार्ह सिंचन सुविधा मिळतील. शासनाच्या विविध योजनांचा समन्वय आणि स्थानिक लोकांचा सहभाग यामुळे हा उपक्रम प्रभावीपणे राबवण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. डियाजियो इंडिया चे कॉर्पोरेट रिलेशन्स डायरेक्टर देवाशीष दासगुप्ता यांनी सुद्धा याविषयी आपले मत मांडले.

### नायगावच्या अन्वय चव्हाणला होमी भाभा स्पर्धेत सिल्व्हर मेडल

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ७ एप्रिल -**

ग्रामीण मातीतून उगवलेल्या प्रतिभेने पुन्हा एकदा राज्याच्या पटलावर आपला ठसा उमटवला आहे. मुंबईतील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे पार पडलेल्या डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत नायगावच्या अन्वय धनराज चव्हाण याने उल्लेखनीय कामगिरी करत सिल्वर मेडल पटकावले. विज्ञानाच्या क्षेत्रात लहान वयातच गवसलेले हे यश नायगावसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. शांकुतल स्कूल फॉर एक्सलन्स, पासदगाव नांदेड, जि. नांदेड येथील इयत्ता सहावीचा विद्यार्थी असलेल्या अन्वयने चर्ळीोळेप नशों थरींश या अभिनव प्रकल्पातून 3R (Reduce, Reuse, Recycle) या संकल्पनेची प्रभावी मांडणी केली.

## आ. कोहळीकर यांनी घेतला उपजिल्हा रुग्णालयाचा आढावा

### स्वतः केली पाहणी व रुग्णांची केली विचारपूस

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ७ एप्रिल -**

हदगाव - हिमायतनगर विधानसभा चे आमदार बाबुराव कदम कोहळीकर हे तालुक्यातील जनतेच्या सर्वात महत्त्वाचा व आरोग्याशी निगडित असलेल्या विविध आजारांविषयी नेहमीच काळजी घेताना दिसून येत आहेत त्यांच्या या कार्याला बळकटी मिळाली ते आरोग्य शिबिर आयोजित करून गरजू व गरीब रुग्णांना मोफत स्वस्त सेवा पुरवल्याची यापूर्वी अनेक आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आली होती त्याच पार्श्वभूमीवर आज उपजिल्हा रुग्णालय, हदगाव जि. नांदेड येथे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत प्रदान करण्यात येणारा 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार' तसेच 'महा आरोग्य सन्मान २०२६ ' हा प्रतिष्ठित पुरस्कार उपजिल्हा रुग्णालय हदगाव (५० बेड) यांना प्रथम क्रमांकाने प्राप्त झाला, ही अत्यंत अभिमानाची व गौरवाची बाब आहे.

या उल्लेखनीय यशासाठी रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारिका,



अधिसेविका, सहाय्यक अधिसेविका, लिपीक वर्ग, तंत्रज्ञ वर्ग, औषध निर्माण अधिकारी, वाहन चालक, कक्षसेवक, सफाईगार, शिपाई तसेच इतर सर्व कर्मचारीवृंद यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

यावेळी रुग्णालयाच्या कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विविध विभागांतील कामकाज, सेवा गुणवत्ता तसेच नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेल्या अडचणी व समस्यांची माहिती घेऊन त्यावर आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच रुग्णालयातील सर्व विभागांची पाहणी करून भविष्यातील सुधारणा व विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी आमदार बाबुराव कदम कोहळीकर , विवेक देशमुख (जिल्हाप्रमुख, नांदेड), वैद्यकीय अधिकारी डॉ. दरबतरवार, डॉ. स्वामी, भास्कर वानखेडे,राजेश तावडे, सुनिल व्यवहारे , विशाल घोडेकर,नामदेव वाकोडे,पांडुरंग जाधव, तुकाराम तवर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## उमरीत २२ एप्रील रोजी उर्स कव्वालीचा शानदार मुकाबला

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ७ एप्रिल -**

हजरत वलीशाहा बाबा यांचा २२ एप्रिल रोजी ऊर्स निमित कव्वालीचा शानदार मुकाबला होणार आहे . दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राष्ट्रीय एकात्मता व उर्स कमिटीच्या वतीने सूफी संत हजरत अली शहा बाबा यांचा २१ एप्रिल रोज मंगळवारी संदल निघणार आहे तर दिनांक २२ एप्रिल रोजी बुधवारी बाबांचा ऊरुस भरणार आहे.

२१ एप्रिल रोजी मंगळवारी हजरत वली शाहा बाबाचा संदल उर्स कमिटीचे सचिव सय्यद चांद शेख यांच्या कोहिनूर फंक्शन हाल येथुन संदल उंटावर व नगारे च्या गजरात निघणार असून हा संदल मुख्य रस्त्याने मोंढा बस स्टॅन्ड होत नगारेच्या गजरात वाजत गाजत हजरत वली शहा बाबा यांच्या दर्ग्यावर चादर व संदल चढवून फातेहा नंतर महाप्रसाद वाटप होणार आहे

दुसऱ्या दिवशी दिनांक २२ एप्रिल रोजी बुधवारी वलिषा बाबा यांचा उरूस भरणार असून रात्री नऊ वाजता कव्वालीचा मुकाबला होणार आहे

कवाली चा मुकाबला वसीम साबरी कव्वाल दिल्ली यांचा मुकाबला कव्वालन






सनम साहिबा कव्वालन दिल्ली यांच्याशी होणार असून या प्रमुख अतिथी खा. रविंद्र पाटील चव्हाण,विशेष आतिथी

सभापती शिरिषभाऊ गोरठेकर,मारोतराव कवळे गुरुजी (व्ही पी के चेअरमेन ), तहसीलदार सौ मंजुषा भगत , मुख्यधिकारी गणेश चाटे , उमरी नगराध्यक्षा शकुंतला भगवान मुदीराज , उपनगराध्यक्ष कैलासभाऊ देशमुख गोरठेकर , माजी नगराध्यक्ष प्रविणभाऊ सारडा ,माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी , उदोजक महमद खाजासेठ कार्यक्रमाचे सचिव शेख बशीर कार्यक्रमाचे आयोजक सय्यद चांद शेठ, उदोजक बापुसाहेब पा.कौडगावकर, पोलिस निरीक्षक जयप्रकाश गुट्टे , शंकर बोलमवार (न .पा उपनगराध्यक्ष धर्माबाद ), विक्रम देशमुख, नियोजन विकास सभापती विष्णू पंडित ,गोविंद बाबा गौड माजी सभापती भोकर, भगवान दंडवे नगराध्यक्ष न पा भोकर ) पांडुरंग देशमुख गोरठेकर, छावा जिल्हाध्यक्ष माधव ताटे, महमद रफिक सेठ,राजीव पाटील ढगे , सुभाष पेरेवार, सन्माननिय नगरसेवक आदी मान्यवर उपस्थित राहाणार असुन कव्वालीचा मुकाबला रात्री नऊ ते पहाटे चार वाजेपर्यंत होणार आहे तरी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक सय्यद चाँद सेठ उमरी यांनी केले आहे .

## महाड चवदार तळे सत्याग्रह दिन 'राष्ट्रीय जलदिन' घोषित करण्याच्या मागणीचे डॉ. भीमराव आंबेडकर यांना निवेदन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ एप्रिल -**

भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा नांदेड उत्तर च्या वतीने दि. ४ एप्रिल रोजी माता रमाई आंबेडकर बौद्ध विहार सहयोगनगर, नांदेड येथे बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली होती. या बौद्ध धम्म परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर उपस्थित होते. यावेळी महाड चवदार तळे सत्याग्रह दिन राष्ट्रीय जलदिन घोषित करण्याच्या मागणीचे निवेदन महेंद्र पिंपळगावकर यांनी त्यांना दिले. यावेळी त्यांनी या मागणीकडे आपण जातीने लक्ष देऊ अशी ग्वाही दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली २० मार्च १९२७ रोजी झालेल्या ऐतिहासिक महाड चवदार तळे सत्याग्रह दिनाला 'राष्ट्रीय जलदिन' म्हणून घोषित करण्यात यावे, या मागणीकरीता मागील दोन वर्षापासून महेंद्र पिंपळगावकर हे सातत्याने प्रयत्नशील आहेत. विविध राजकीय पक्ष व विरोधी पक्षाच्या नेत्यांना प्रत्यक्ष भेटून ही मागणी लावून धरण्यात आली आहे.

या धम्म परिषदेला उपस्थित मान्यवरांनी ही मागणी संयुक्तीक असल्याचे सांगून भविष्यात या मागणीकरीता जनआंदोलन उभारण्यात येईल असे सांगून पिंपळगावकर यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले व राष्ट्रीय जलदिन घोषित करण्याचा ठराव या बौद्ध धम्म परिषदेत पारित करण्यात आला.

या धम्म परिषदेला भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे प्रमुख डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर, पूज्य भिक्खू शिलरत्न थेरो, भदंत पंय्याबोधी महाथेरो, अॅड. एस.के. भंडारे, डॉ. राजारामजी बडगे, यु.जी. बोराडे, माजी न्या.डॉ. यशवंतराव चावरे, समता सैनिक दलाचे मेजर सुरेश गजभारे आदींची उपस्थिती होती.

## हाणेगाव येथील शिवाजी आडेकर यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. ७ एप्रिल -**

येथील रहिवाशी सध्या मुक्रामाबाद पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेले निर्भीड निस्वार्थ कर्तव्यदक्ष असलेले पोलीस जमादार शिवाजीराव आडेकर यांनी पोलिस दलात अनेक वर्ष सेवा बजावत आहेत त्यांनीं नुकतेच २०१३ विभागीय अहर्ता परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे व आपल्या कार्याच्या जोरावर पोलीस दलातील एक उच्च पदस्थ पदावर पदोन्नती झाल्यामुळे देगलूर तालुका व तालुक्यातील परिसरात त्यांचे अभिनंदन होताना दिसते आहे तर त्यांना मित्रपरिवार कडून शुभेच्छा देऊन आशीर्वाद देत आहेत.

पोलीस दलात त्यांची गेली वीस ते तीस वर्ष निस्वार्थ कर्तव्यदक्षपणे सेवा करून उपनिरीक्षक म्हणून निवड झाली आहे त्यांनी सेवेत कार्यरत असताना अनेक पोलीस दलातील स्पर्धा व अनेक अहवांनाना निर्भीडपणे तोंड दिले लोकांमध्ये पोलिसांची वचक ठेवून सामान्य लोकांना भयमुक्त जीवन जगण्याचे वातावरण त्यांनी आपल्या सेवा काळात केले शिवाजी आडेकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन आजच्या पिढीतील युवकांना एक उत्तम असे उदाहरण त्यांनी दाखवून दिले की यश मिळवण्यासाठी पैशाची नाही तर मेहनत, जिद्द, चिकाटी, व अभ्यासाची गरज आहे असे त्यांनी एक उच्च पद घेऊन सर्व युवकांना एक आदर्श दिला त्यांनी पोलीस उपनिरीक्षक पद मिळाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना ते प्रेरणादायी ठरेल कारण देगलूर तालुक्याच्या हाणेगाव विभागातील किमान ४० ते ५० गावा मधून बौद्ध समाजातील हे प्रथम पोलीस दलातील उच्चपदस्थ असल्यामुळे ते सर्व समाजातील विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरत असताना दिसतो आहे म्हणून शिवाजी धोंडीबा आडेकर यांच्या निवडीबद्दल अनेक पोलीस दलातील अधिकारी, व राजकीय , सामाजिक, क्षेत्रातील व्यापारी क्षेत्रातील, मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या रमेश देशमुख शीळवणीकर , राजेश पंदरगे , प्रा, बालाजी नाईकवाडे , पत्रकार फारुख पटेल,बालाजी हनवटे ग्रामविकास अधिकारी, मधुकर भास्करे, मनोहर भास्करे, दिलीपराव भोसले ,नागूराव साधू, सिद्धार्थ मल्लापुरकर,रमेश शिवणीकर,किशोर आडेकर,वसंत आडेकर व तसेच मुकरामाबाद पोलीस ठाणे चे ए पी आय राजु चव्हाण व मरखेल पोलीस ठाण्याचे कर्मचारी आडेकर परिवार मित्रपरिवार यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## कायापालट उपक्रमातुन ४७ व्यक्तींना स्वच्छतेसह सन्मानाने जीवन देण्याचा प्रयत्न

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ एप्रिल -**

शहरात उपेक्षित, निराधार आणि मानसिक आजारग्रस्त व्यक्तींना सन्मानाने जगण्याची नवी संधी देणारा कायापालट हा उपक्रम एप्रिल महिन्याच्या पहिल्या सोमवारी ७४ व्या महिन्यातही तितक्याच तळमळीने पार पडला. धर्मभूषण अॅड. दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून यावेळी ४७ भ्रमिष्ट व्यक्तींना स्वच्छतेसह सन्मानाचे जीवन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. गेल्या ७४ महिन्यांत ३७०० हून अधिक बेघर, भिकारी आणि मानसिक आजारग्रस्तांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारा हा उपक्रम आता नांदेडच्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक ठरत आहे.

या उपक्रमाला माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष संजय कोडगे, अॅड. चैतन्य देशमुख, भाजपा अध्यक्ष अमरनाथ राजुरकर, डॉ. संतुकराव हंबर्डे, ड. किशोर देशमुख तसेच लायन्स उपप्रांतपाल योगेश जायस्वाल यांचे मार्गदर्शन लाभत आहे. भाजपा महानगर नांदेड, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल, सन्मित्र फाउंडेशन आणि अमरनाथ यात्रेकरू संघ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे.

रस्त्यावर राहून स्वतःची ओळख हरवलेल्या, अनेक दिवस अस्वच्छतेत जगणाऱ्या या व्यक्तींमध्ये या उपक्रमामुळे आश्चर्यकारक बदल दिसून आला. मोफत दाढी-कटिंग, साबणाने स्नान, नवीन कपडे, चहा-फराळ तसेच प्रत्येकी १०० रुपयांची बक्षिसी देत त्यांना आपणही समाजाचा एक भाग आहोत ही भावना जागवण्यात आली.

सुरेश शर्मा,अरुण काबरा, संजयकुमार गायकवाड ,प्रभुदास वाडेकर, महेंद्र शिंदे यांनी शहरातील विविध रस्त्यांवरून लाभार्थ्यांची निवड करून पहाटे गोवर्धन घाट येथे आणले. राजू अण्णा पुसनूर आणि प्रसाद या स्वयंसेवकांनी दाढी-कटिंगची जबाबदारी पार पाडली. स्नानासाठी आवश्यक पाण्याची व्यवस्था कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुरेश लोट यांनी केली. सुभाष बंग यांनी बनियन दिले. डॉ. अर्जुन मापारे यांनी मोफत आरोग्य तपासणी करून औषधोपचार दिले, तर स्नेहलता जायस्वाल, जयश्री ठाकूर आणि रेखा नगारे यांच्या हस्ते सर्वांना नवीन कपडे देण्यात आले.

कार्यक्रमानंतर सदाशिव कंधारे यांच्या



मार्गदर्शनाखाली मनपा कर्मचाऱ्यांनी गोवर्धन घाट परिसराची स्वच्छता करून स्वच्छता हीच खरी सेवा हा संदेश दिला.

दरम्यान, येत्या मे महिन्याच्या पहिल्या रविवारी शहरात असहाय्य, मानसिक आजारग्रस्त किंवा उपेक्षित व्यक्ती आढळल्यास भाजप किंवा लायन्स क्लबच्या सदस्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन संयोजक अॅड. दिलीप ठाकूर यांनी केले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या सरचिटणीसपदी महेश म्हेत्रे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०७ एप्रिल :** तालुक्यातील तांबरवाडी येथील युवा नेते महेश शोभाबाई लहू म्हेत्रे यांची महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मा. शिवराज मोरे यांच्या स्वाक्षरीने त्यांचे नियुक्तीपत्र नुकतेच जारी करण्यात आले आहे.

महेश म्हेत्रे यांच्या निवडीमुळे प्रदेश युवक काँग्रेसमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आगामी काळात संघटन विस्ताराला नवी गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महेश म्हेत्रे यांची ही नियुक्ती त्यांच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी संघटनात्मक कामगिरीची पावती मानली जात आहे. युवक काँग्रेसमध्ये त्यांनी तळागाळापासून काम करत आपले नेतृत्वगुण सिद्ध केले आहेत. २०२३ साली प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी राज्य पातळीवर विविध उपक्रम, बैठका आणि संघटनात्मक मोहिमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आपला ठसा उमटवला आहे.

तसेच, पक्षाच्या राष्ट्रीय स्तरावरील विविध महत्त्वाच्या मोहिमांमध्येही त्यांनी सक्रिय भूमिका बजावली असून युवकांच्या प्रश्नांवर ठामपणे आवाज उठवला आहे. त्यांच्या कार्यशैलीमुळे युवक कार्यकर्त्यांमध्ये त्यांचे नेतृत्व अधिक बळकट झाले आहे.



## विविध वृत्त...

### शिक्षकांनी समर्पणाच्या भावनेतून ज्ञानदानाचे कार्य करावे – केंद्रे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** शिक्षक हा समाजाचा आरसा असतो. शिक्षकांकडून समाजाला मोठ्या अपेक्षा असतात. शिक्षकांनी समर्पणाच्या भावनेतून ज्ञानदानाचे कार्य करणे हे समाज आणि राष्ट्र निर्मितीसाठी अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केले. एज्युकॉन पुरस्काराने केंद्रे दाम्पत्याचा सन्मान करण्यात आल्याबद्दल येथील संगमेश्वर विद्यामंदिरच्यावतीने राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व अध्यक्ष के. ए. जायेभाये यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य केंद्रे म्हणाले, शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवणारे नसून, ते विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार देणारे शिल्पकार असतात. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ गुणात्मात शिक्षण न देता सुसंस्कार, राष्ट्रप्रेम व सामाजिक मूल्यांची शिकवण द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

### राजा नारायणलाल लाहोटी शाळेत ‘स्वरपौर्णिमा’ मैफिल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या संगीतकलेला प्रोत्साहन देण्यासाठी ‘स्वरपौर्णिमा’ हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. दर पौर्णिमेला सायंकाळी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. चैत्र पौर्णिमा व हनुमान जयंतीच्या निमित्ताने सहावी स्वरपौर्णिमा संगीत मैफिल उत्साहात पार पडली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलु व रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीमती अरुल सेल्वी यांनी भूषवले. उपक्रमाची संकल्पना सौ. देवयानी देशपांडे यांनी मांडली.संगीत मैफिलीत विद्यार्थ्यांनी विविध भक्तिगीते सादर केली. आरुष अग्रवाल, प्रिशा सोनी आणि सार्थ अग्रवाल यांनी हनुमान चालिसा गायन केले. माहिषा विपत, रिचा शहाणे व काव्या चौधरी यांनी ‘रामचंद्र कृपालु’ हे गीत सादर केले. अनिका झंवर व कनक तोष्णीवाल यांनी ‘पायो जी मैने’ हे गीत गायले. मानसी ठाकरे आणि अनघा बिडवे यांनी ‘कभी राम बनके कभी श्याम बनके’ हे गीत सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.यावेळी आदित्य पाटील याने शंखवादन सादर केले. शाळेतील शिक्षक कौस्तुभ जोशी यांनी ‘नादातून या नाद निर्मितो’ ही रामस्तुती सादर केली. कार्यक्रमाचा समारोप शिक्षिका गीता मुंडे यांच्या गीताने झाला.विद्यार्थ्यांना संगीत विभागातील शिरीष देशपांडे, गीता मुंडे, कौस्तुभ जोशी व कृष्णा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानवी उगिले व श्रेया चाकोते यांनी केले.या कार्यक्रमाला मनोहर कबाडे, बी. के. भालेराव, आशिद बनसोडे, संदीप केंद्रे, सुनील मुनाळे, वर्षा खुंटेगावे, मंजुषा भोसले, मनीषा मगर, दर्शन देशपांडे यांच्यासह कर्मचारीवृंद व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा – डॉ. सौताडेकर

**लातूर/प्रतिनिधी :** विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या शिक्षण प्रक्रियेतील त्रिसूत्री आहेत. आजची पिढी सुशिक्षित करण्याकडे आपला भर असून संस्काराकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे वर्तमान स्थितीत विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाधीनता आणि गुन्हेगारीचे प्रमाण वाढताना दिसत आहे. पूर्वीची पिढी आई-वडिलांसाठी प्राण द्यायला तयार होत होती, परंतु आजची पिढी त्यांच्यासुध्दा प्राणावर उठली आहे . विनयशीलता, श्रद्धाभाव आणि संवेदनशीलता या बाबींचा मोठा अभाव जाणवतो आहे. त्यामुळे शिक्षणाबरोबरच शिक्षकांसोबत पालकांनी संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी पुढाकार घेणे नितांत गरजेचे आहे असे प्रतिपादन साहित्यिक तथा इतिहास अभ्यासक डॉ. विवेक सौताडेकर यांनी व्यक्त केले.

लातूर येथील श्री शैक्षणिक संकुलात पालक मेळाव्या करण्यात आले होते. या पालक मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. दिलीप गुंजरगे हे होते यात्रसंगी मंचावर संस्था अध्यक्ष श्रीम. सरस्वती शिंदे, श्री विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्री श्रीम. मनीषा शिंदे गुंजरगे ,संस्था संचालक सौ.मोहिनी चौधरी, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. घाडगे, प्राचार्य मनोज कुलकर्णी,प्राचार्य माने, प्रा.खंदारे, मोहिते सर आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका मनीषा शिंदे यांनी केले. याप्रसंगी विविध स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात डॉ. दिलीप गुंजरगे म्हणाले की, शाळा आणि पालक हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करताना दिसून यावेत. पालकांनी आपला पाल्य कमीत कमी मोबाइलचा उपयोग करेल याकडे लक्ष दिले पाहिजे. सध्या मुले वाचन व स्वयंअध्ययन विसरले आहे. हे घटक मुलांमध्ये निर्माण करण्यासाठी पालक व शाळेने प्रयत्न केले पाहिजेत असे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल गायकवाड तर आभार किरण जगताप यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# नागरी समस्यांची सोडवणूक होणार तरी केव्हा?

## पिण्याच्या पाण्यासह अन्य सोयी सुविधांसाठी होतेय लातूरकरांनी परवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०७ एप्रिल :** उन्हाळ्याची नुकतीच चाहूल लागली असून नियमित नळाद्वारे पिण्याच्या पाण्यासह रस्ते, स्वच्छता आदी महत्वपूर्ण सुविधांअभावी सामान्य लातूरकरांची खूपच परवड होताना दिसत आहे. लातूर मनपाचा कारभार आता पूर्णवेळ पदाधिकाऱ्यांच्या हाती सोपविण्यात आल्याने नूतन पदाधिकाऱ्यांनी तात्काळ नागरी समस्यांची सोडवून करण्यास प्राधान्य द्यावे,अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.

लातूर शहरातील नागरिक राज्यातील अन्य शहरांमधील नागरिकांच्या मानाने खूपच सोशिक आणि सहनशील आहेत. याची प्रचिती मागच्या अनेक वर्षांपासून सातत्याने येताना दिसते. नळाला आठवड्यातून एकदा पाणी आले काय किंवा पंधरा दिवसातून – महिन्यातून एकदाच पाणी आले काय ? लातूरचा नागरिक कधीही पेटून उठताना दिसून येत नाही. शासन – प्रशासन जसे बोटावर खेळवेल तसे येथील लोक खेळण्यात धन्यता मनात असल्याचे दुर्दैवाने पाहायला मिळते. लातूर नगर परिषदेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यापासून लातूरमध्ये फारसे उल्लेखनीय बदल झाल्याचे दिसत नाही. नपचे मनपात रूपांतर झाल्याने नागरिकांना भराव्या लागणाऱ्या स्थानिक करात झालेली वाढ वगळता अन्य काही उल्लेखनीय झाल्याचे स्पष्टपणे दिसत नाही. नाही म्हणायला कोणताही मोठा प्रकल्प नसतानाही लातूर शहरातील जमीन, प्लॉट, फ्लॅटच्या किंमती मात्र लातूरच्या तुलनेत कितीतरी पटीने मोठे आणि विकसित असलेल्या छत्रपती संभाजीनगरपेक्षा अधिक असल्याचे वास्तव आहे. लातूरला शिक्षणाची पंढरी असे संबोधले जात असल्याने कदाचित असे होत असावे,असा जाणकारांचा अंदाज आहे.

शिक्षण – व्यवसायाच्या निमित्ताने लातूरमध्ये स्थानिकांपेक्षा बाहेरच्या नागरिकांचा वावर – वास्तव्यही मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळेही स्थानिक प्रशासन नागरीसुविधांची उपलब्धी करण्याकामी कमी पडत असल्याचेही बोलले जाते.शहराचा विस्तार आता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. वाढत्या विस्ताराच्या मानाने नागरी सुविधांचा अभाव अधिक असल्याचे प्रत्यक्षात दिसून येते. लातूरला पाणी पुरवठा करणाऱ्या धनेगाव धरणात कितीही मुबलक पाणीसाठा असला तरी लातूरकरांना आठवड्यातून एकदा, फार फार तर दोनदा पाणी मिळते. धरणातील पाणी मग जाते तरी कोठे ? असा प्रश्न मागच्या अनेक वर्षांपासून उपस्थित केला जात असल्याचे पाहायला मिळते. यापैकी बहुतांश पाणी ऊस उत्पादक शेतकरी आपल्या पिकांसाठी वापरत असल्याचे माहिती असूनही आतापर्यंत एकदाची प्रशासनाकडून त्यादृष्टीने योग्य ती उपाययोजना केली गेल्याचे निदर्शनास येत नाही. म्हणूनच लातूरचा कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मागच्या अनेक वर्षात सुटू शकलेला नाही. कोणतीही सार्वत्रिक निवडणूक आली की, लातूरचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी उजनीचे पाणी आणण्याचे आश्वासन दिले जात. ही बाब मागच्या अनेक वर्षात शक्य झाली नसल्याने राजकारणी केवळ मते मिळवण्यासाठी खोटे आश्वासन देतात, हे न कळण्याएवढे लातूरकर सुज्ञ नाहीत, हे पाहून खरोखर वाईट वाटते.

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असो की शहरातील स्वच्छतेचा. कोणत्याही कामात पूर्णत्व दिसून येत नाही, हे दुर्दैवाने नमूद करावेसे वाटते. कधी कधी पावसाळ्याच्या दिवसात लातूरला नळाद्वारे येणारे पाणी दूषित, दुर्गंधीयुक्त, पिवळे येते. आता तर उन्हाळ्यातही पाणी पिवळे येत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. स्थानिक प्रशासनाने ही समस्या सोडविण्याचे आश्वासनही दिले आहे. मात्र, असा प्रकार घडतोच का ? याच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न प्रशासनाने करणे गरजेचे आहे. शहराच्या अनेक भागातील रस्त्यांची अवस्था अतिशय वाईट झाल्याचे पाहायला मिळते. अनेक भगत चांगले असलेले रस्ते कोणत्या ना कोणत्या विकास कामांच्या नावाखाली उखडून टाकण्यात आल्याचे दिसून येते. अनेक भागातील स्ट्रीट लाईट बंद आहेत. या नागरी समस्यांच्या पूर्ततेसाठी नूतन मनपा पदाधिकाऱ्यांनी धडाडीने कामाला लागावे. मनपा प्रशासनाला त्यासाठी सळो की पळो करून सोडावे,अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०७ एप्रिल :** येथील एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात फ्युचर ट्रेंड्स इन जनरेटिव्ह एआय : FUGEN-AI २०२६ या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेसाठी की-नोट स्पीकर म्हणून कु.सोनाली पटवे ( ग्रुप प्रॉडक्ट मॅनेजर, टाटा डिजिटल, पुणे) तसेच प्रमुख पाहुणे म्हणून श्री मंथनजी त्रिवेदी ( सिनियर मॅनेजर, टाटा सन्स, मुंबई ) आणि श्री आकाशजी राठी (चेअरमन, लातूर अर्बन बँक )उपस्थित होते.

या परिषदेत देशभरातून शोधनिबंध सादर करण्यासाठी संशोधकांनी सहभाग घेतला. या परिषदेचे मुख्य आकर्षण म्हणजे एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आर्टिफिसिअल इंटेलिगन्स या विषयावर शोधनिबंध सादर केले.

या परिषदेचे आयोजन डॉ. अस्मिता देशपांडे,डॉ. ओमप्रकाश शिवपुजे व डॉ. एन. एन. हलगरे यांनी केले. परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री. माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव श्री. माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री. सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री. विजय रेवडकर, कार्यकारी संचालक श्री. प्रदीप दिंडेगावे, संचालक श्री. राजेश्वर बुके, श्री. बसवराज येरटे, श्री. काशिनाथ साखरे, सौ. ललिता ताई पांढरे, श्री. महेश हलगे, श्री. बाबुराव तरगुडे व श्री. गुरुलिंग धाराशिवे यांनी संबंधित प्राध्यापकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर जगदे, उपप्राचार्य वीरभद्र बाळे हेही उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संबंधित प्राध्यापकांनी केलेल्या अथक परिश्रमाबद्दल त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी ॲड. मुचाटे तर उपाध्यक्षपदी विश्वास अंबेकर यांची निवड



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०७ एप्रिल :** दि. ५ एप्रिल २०२६ रोजी जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२६ च्या वतीने महालक्ष्मी मंदिर गांधी चौक येथे आयोजित केलेल्या बैठकीत लातूर शहरातील सर्व लिंगायत समाज बांधव यांच्या साक्षीने सदरील निवड करण्यात आली.

तसेच सर्व समाज बांधवांच्या सहमतीने अध्यक्ष यांची निवड करताना अनुमोदक नितीन दादा मोहनाळे,जगदिश येरटे व सुचक महेश कोळ्ळे तसेच समितीच्या सचिव पदी बालाजीआप्पा झिपरे सहसचिव रोहीतआप्पा चवळे कोषाध्यक्ष लखन कावळे कार्याध्यक्षपदी मुकेश उटगे, गणेश हेरकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सदरील निवड करत असताना उपस्थित चंद्रकांतआप्पा बावगे, ओमआप्पा धरणे, बसवेश्वरजी हेंगणे, नागेशजी उटगे, धुळप्पा अरबळे, सुशील वेळापुरे, धीरज रंजिले,सागर वाघमारे,मंगेशजी पाटील, आनंदजी स्वामी, ओमप्रकाशजी झुरळे,किरणजी खोबरे, संकेतजी उटगे, विरेश वाले, विकास स्वामी, सुनिल ताडमाडगे, अमित खराबे, प्रसाद जगताप, शंकर खोबरे, विकास धरणे, अशिष बोंडगे, संताजी यादव,नारायण गवळी, ॲड.बंटी हालकुडे, रणजितजी मानकरी,आकाश महाजन,राहूल नारगुंडे,निखिल शेटकार, प्रतिक स्वामी,कुणाल गिरवलकर आदी लिंगायत बांधव उपस्थित होते.

तरी समितीचे अध्यक्ष यांनी असे जाहीर आवाहन केले आहे कि जयंतीची पुढील रूपरेषा ठरविण्यासाठी सदरील बैठक ही पचशे घर मठ आझाद चौक लातूर येथे लवकरात लवकर होणार आहे तरी सर्व समाज बांधव यांनी जास्तीत जास्त संख्येने बैठकीला उपस्थित रहावे..

## बाजार समिती पदाधिकारी-व्यापाऱ्यांची पोलीस प्रशासनासोबतची बैठक यशस्वी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०७ एप्रिल :** लातूर शहरातील अत्यंत महत्त्वपूर्ण व व्यापारी दृष्टीने गजबजलेल्या कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्थापन तसेच व्यापारी, शेतकरी व नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींच्या पार्श्वभूमीवर आज पोलीस अधीक्षक कार्यालयात सविस्तर व व्यापक बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या अडचणी ऐकून घेऊन त्यांच्या अडचणीचे निवारण केले.



यावेळी लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, सचिव चंद्रकांत पाटील, सर्व सभासद,विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी, स्थानिक व्यापारी तसेच संबंधित पोलीस ठाण्याचे अधिकारी उपस्थित होते.लातूरची बाजारपेठ ही सर्वात जुनी बाजारपेठ असून येथे दररोज पहाटेपासूनच मोठ्या प्रमाणावर व्यवहार सुरू होतात. विशेषतः पहाटे पाच ते सकाळी आठ या कालावधीत हजारो शेतकरी, व्यापारी व ग्राहक एकाच वेळी बाजारात दाखल होत असल्याने परिसरात प्रचंड गर्दी निर्माण होते. परिणामी वाहतूक कोंडी, गोंधळ, पार्किंगची समस्या तसेच सुरक्षेच्या दृष्टीने विविध अडचणी निर्माण होत असल्याचे या बैठकीत स्पष्ट झाले.

या अनुषंगाने वाहतूक कोंडी ही प्रमुख समस्या मानून गुळ मार्केट ते शिवाजी मार्केट गेट या मार्गावरील रहदारीचे नियोजन करण्यावर विशेष भर देण्यात येईल. रहदारीचे शिस्तबद्ध नियमन करण्यात येणार असून वाहनांच्या प्रवेश व निर्गमनासाठी स्वतंत्र मार्ग निश्चित करणे, ठराविक वेळेनुसार वाहनांची आवक-जावक नियंत्रित करणे, गर्दीच्या वेळेत वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या प्रमाणात तैनात करणे तसेच आवश्यक तेथे तात्पुरते निर्बंध लागू करणे याबाबत संबंधित अधिकारी यांना सुस्पष्ट निर्देश देण्यात आले. तसेच बाजार परिसरात व्यापाऱ्यांकडून रस्त्यावर होणारे अतिक्रमण ही गंभीर बाब असल्याचे निदर्शनास आले. यामुळे रहदारीत अडथळे निर्माण होऊन नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या समन्वयाने विशेष मोहिम राबवून रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात येणार असून यासाठी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्यात येईल. अतिक्रमणाविरोधात सातत्यपूर्ण व कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

बैठकीत बाजार परिसरात सुरू असलेल्या अवैध दारू विक्री, मटका तसेच इतर बेकायदेशीर व्यवसायांचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी संबंधित पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश देण्यात आले. अशा प्रकारच्या गुन्हेगारी कृत्यांवर तात्काळ व कठोर कारवाई करून परिसर गुन्हेमुक्त करण्यावर भर देण्यात आला. याशिवाय बाजार परिसरात चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी विशेष उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. चोरीस गेलेल्या मुद्देमालाचा शोध घेणे, आरोपींचा शोध लावून त्यांना अटक करणे तसेच चोरी प्रतिबंधासाठी प्रभावी यंत्रणा उभी करणे यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही विशेष चर्चा करण्यात आली असून बाजार परिसरात महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी अतिरिक्त पोलीस गस्त, संवेदनशील ठिकाणी विशेष देखरेख, आवश्यकतेनुसार महिला पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती तसेच छेडछाड व इतर गुन्ह्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

भाजीपाला विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना तसेच खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना सुरक्षित, सुलभ व सुव्यवस्थित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी बाजार परिसरात पोलीस गस्त वाढविण्यात येणार असून अतिरिक्त पोलीस अधिकारी व अंमलदारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. संवेदनशील ठिकाणी विशेष लक्ष ठेवून नागरिकांच्या तक्रारींना तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी नियंत्रण यंत्रणा अधिक सक्षम करण्यात येणार आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी स्पष्ट केले की, मार्केट परिसरातील सर्व समस्या अत्यंत गांभीर्याने घेतल्या जात असून त्यावर तातडीने व परिणामकारक उपाययोजना करण्यात येतील. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी व्यापारी, शेतकरी व नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कृषी उत्पन्न बाजार समिती यांचे मार्फतीने बाजार समिती तसेच मार्केट परिसरात जास्तीत जास्त सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत व समितीमार्फत खाजगी सुरक्षा रक्षक यांची नियुक्ती करावी जेणेकरून बाजार परिसरातील सर्व अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी मदत होईल असे कृषी उत्पन्न बाजार समिती लातूर यांना आवाहन केले आहे.

सदर बैठकीमुळे मार्केट परिसरातील विविध समस्या सोडविण्यासाठी ठोस दिशा मिळाली असून व्यापारी, शेतकरी व नागरिकांमध्ये विश्वास व सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. भविष्यातही अशा समन्वय बैठकीद्वारे प्रशासन व नागरिक यांच्यातील संवाद अधिक दृढ करून सार्वजनिक हिताच्या दृष्टीने प्रभावी व दीर्घकालीन उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.